
म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.
BK-0021704





# ऐंशी दिवसांत पृथ्वी प्रदक्षिणा

सौ. कमलाबाई टिळक

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना.—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल

[क्र. मा. प.]



REFBK-0021704

# ऐंशी दिवसांत पृथ्वी प्रदक्षिणा

सौ. कमलाबाई टिळक

ऐंशी दिवसात
पृथ्वीप्रदक्षिणा

मूळ लेखक ज्यूल्स् व्हर्न
रुपांतर सौ. कमलाबाई टिळक

मुद्रक / प्रकाशक
सर्जेराव घोरपडे

मुद्रण
प्रिंटेक्स्ट
४६१/१ सदाशिव पेठ
टिळक रोड, पुणे ३०

प्रे स्टी ज
प्र का श न

किंमत सहा रुपये

## प्रास्ताविक

ऐंशी दिवसात पृथ्वीप्रदक्षिणा ?

हात्तिच्या ! तुम्ही म्हणाल, ऐंशी दिवस कशाला पाहिजेत ? ऐंशी तासांतसुद्धा सहज करता येईल पृथ्वीप्रदक्षिणा. पण मंडळी, हे तुम्ही आजच्या विमानाच्या युगात बोलता आहा.

ज्यूलस् व्हर्न या फ्रेंच लेखकाने ही गोष्ट लिहिली शंभर वर्षांपूर्वी.

तेव्हा विमानाचा शोध लागला नव्हता. आगगाड्या, आगबोटी पण आतापेक्षा खूपच हळूहळू चालत असत. अशा त्या काळात आमच्या नायकाने– मिस्टर फॉग याने– पैज मारून ऐंशी दिवसांत पृथ्वीप्रदक्षिणा करून दाखविली. मोठी रोमांचकारी व चित्तथरारक आहे ही हकीगत

# १ नवीन नोकराची नेमणूक

ऐंशी दिवसांत पृथ्वीप्रदक्षिणा करणारे मिस्टर फॉग लंडनमध्ये राहात होते. खरे म्हणजे त्यांच्या एकंदर दिनक्रमावरून व वागणुकीवरून ते मोठे साहसी पुरुष असावेत असे काही कुणाला वाटले नसते.

मि. फॉग यांचे दैनंदिन जीवन अगदी संथ पण शिस्तीचे व वक्तशीर होते. आपल्या रोजच्या ठराविक साच्याच्या जीवनात कसलाही फरक व व्यत्यय त्यांना खपत नसे. म्हणूनच मला वाटते, त्यांनी लग्न केले नसावे. कारण लग्न म्हणजे बायको, मुले वगैरे लटांबर मागे लागलेच. मग बाहेर जाणे, दुसऱ्यांचे आपल्याकडे येणे, मेजवान्या देणे-घेणे आलेच. पण मि. फॉग घर व त्यांचा क्लब यापलीकडे दुसऱ्या कुठल्याही ठिकाणी जात नसत, शिवाय बायका-मुले म्हणजे घरात पसारा, गोंधळ आलाच, आणि फॉग यांचे घर म्हणजे जणू प्रदर्शनच मांडलेले, इकडची वस्तू कधी तिकडे व्हायची नाही. मि. फॉग यांची शिस्त भलतीच कडक. अहो, दहाबारा वर्षांचा आपला जुना नोकर त्यांनी आजच तडकाफडकी काढून टाकला होता. का ? तर त्यांचे दाढीचे पाणी त्याने ८६° सेंटीग्रेड उष्णतामानाचे आणण्याऐवजी ८४° सेंटीग्रेड उष्णतामानाचे आणले म्हणून.

हा नोकर व ते स्वतः एवढीच घरात काय ती माणसे व ती घड्याळाच्या काट्यांशी बांधलेली. त्यांनी नोकराच्या खोलीत मुळी वेळापत्रकच भिंतीला चिकटवून ठेवले होते

सकाळी आठ वाजून तेवीस मिनिटांनी सकाळचा चहा व भाजलेला पाव खोलीत आणून देणे.

सकाळी नऊ वाजून सदतीस मिनिटांनी दाढीचे पाणी ८६° सेंटीग्रेड उष्णतामानाचे वगैरे वगैरे...

बरोबर दुपारी ११॥ वाजता मि. फॉग आपल्या क्लबमध्ये

जाण्यासाठी घराबाहेर पडत. क्लबमध्येच त्यांचे जेवण, दुपारचा चहा होई. बरोबर अकरा वाजता रात्री ते घरी यायला निघत घरी येऊन बारा वाजता ते झोपी जात.

पोट भरण्यासाठी कुठलाही व्यवसाय किंवा नोकरी करताना कुणी त्यांना पाहिले नव्हते. पण त्यांच्यापाशी बराच पैसा असावा. कारण त्यांची राहणी, कपडे वगैरे रुबाबदार असत. ते जात तो ' रिफॉर्म क्लबही ' बड्या लोकांचा होता. क्लबमध्ये संध्याकाळी ते पैसे लावून पत्ते खेळत. जिंकलेले पैसे ते लगेच रस्त्यावरील गरिबांना देऊन टाकत.

त्यांच्या वागण्याप्रमाणेच त्यांचे कपडेही अगदी शिस्तीत असत. त्यांच्या कपड्यांवर नंबर असत व कुठल्या दिवशी कुठल्या क्रमांकांचे कपडे वापरायचे याची नोंद केलेली असे. इतके शिस्तीचे, एका साच्याचे, संथ, शांत जीवन जगणारा माणूस पृथ्वीप्रदक्षिणा करायला निघतो व तोही असा घाई-गर्दीत, ऐंशी दिवसांत प्रवास पुरा करण्याची पैज लावून, म्हणजे एक मोठे आश्चर्यच आहे, नाही ? पण ते कसे घडले याची हकीगत आता ऐका हं.

तो दिवस होता दोन ऑक्टोबरचा. मि. फॉग क्लबमध्ये जायच्या तयारीने बैठकखान्यात बसले होते. घड्याळ समोर टेबलावर होते. घड्याळ होते मजेदार. सेकंद, मिनिटे, तास व दिवस-महिना-वर्ष दाखवणारे. तोच आधी ठरल्याप्रमाणे त्यांचा जुना नोकर एका माणसास घेऊन आत आला

हा माणूस म्हणजे नव्याने ज्याची नेमणूक व्हायची होती, तो नोकर होता. तो फ्रेंच होता व त्याचे नाव होते ' ज्याँ पासेपार्तु '. फार अवघड नाव आहे नाही ? आपण आपले त्याला धडपडे म्हणू. त्याच्या स्वभावाला साजेसेच नाव आहे ते.

जुन्या नोकराला प्रथम वाटले होते की, नावाप्रमाणेच धडपड्या व उतावळ्या स्वभावाच्या या माणसाचे आपल्या संथ, शांत स्वभावाच्या मालकाशी कसे काय जमेल ? पण

मग त्याला कळले की, धडपडे पाच-सहा मालकांपाशी धडपडीची नोकरी करून आता कंटाळला होता. आता त्याला कुठेतरी जरा शांतपणे, स्वस्थपणे राहायचे होते.

'धडपडे तुझे नाव?' मि. फॉग म्हणाले. 'ठीक आहे. माझ्या घरी कराव्या लागणाऱ्या कामांची कल्पना तुला या माझ्या जुन्या नोकराने दिली असेलच. तुला नोकरीवर ठेवला आहे. किती वाजले तुझ्या घड्याळात?'

धडपडेने खिशातून एक भलें मोठे चांदीच्या चौकटीचे घड्याळ बाहेर काढले,

'अकरा वाजून २५ मिनिटे.'

'तुझे घड्याळ चार मिनिटे मागे आहे. आपले घड्याळ खिशात घालीत मि. फॉग म्हणाले.

'माफ करा, मालक. पण शक्य नाही ते.' धडपडेला आपल्या घड्याळाचा भलताच अभिमान होता.

'घड्याळ माझ्या घड्याळाबरोबर लाव. या क्षणापासून, म्हणजे सकाळी अकरा वाजून एकुणतीस मिनिटांनी, बुधवार, २ ऑक्टोबर, १८७२ या दिवशी मी तुला नोकरीवर रुजू करून घेतले आहे.'

असे म्हणून बरोबर ११॥ वाजता मि. फॉग क्लबमध्ये जाण्यासाठी घराबाहेर पडले. जुना नोकर आपले सामान घेऊन निघून गेला व धडपडे आपल्या नव्या घराची पाहाणी करीत हिंडू लागला.

धडपडेला आपला मालक एकदम पसंत पडला होता—चाळीस वर्षांचे, उंचेपुरे, रुबाबदार, देखणे असा मि. फॉगची शांत, चढेल वागणूक व मितभाषीपणा त्याला आवडला होता.

आमचा धडपडे पण तसा दिसायला बरा होता. हसतमुख चेहरा, मेहनतीने कमावलेले शरीर, पोशाख ठाकठीक; केस मात्र विस्कटलेले. कंगव्याच्या दोन-तीन फटकाऱ्यांत त्याची केशभूषा पुरी व्हायची.

घरही मोठे ठाकठीक, किंमती सामानाने भरलेले. घर पाहात

पाहात धडपडे माडीवर गेला. तिथे त्याला दिलेली खोली होती. सुखसोयी उत्तम. भिंतीत घंटा, बोलण्याची नळी बसवलेली; त्यातून मालकाचे हुकूम यायचे. खोलीतले घड्याळ मालकाच्या खोलीतल्या घड्याळाशी मिळतेजुळते. जुन्या नोकराने मालकाबद्दलची माहिती पुरवली होती. मि. फॉग सकाळी आठ वाजता उठत; ११॥ वाजता घराबाहेर पडत. तेवढा वेळच काय ती मालकाच्या हुकुमांची तामिली करायची. मालक परत यायचे रात्री ११॥ वाजता. ते बारा वाजता झोपी जाईपर्यंत काय काम सांगतील ते करायचें—बस्स— बारे नोकरी! घरात दुसऱ्या कुणाची कटकट नाही. दिवसाचे बारा तास आपणच घराचे राजे. धडपडे अगदी खूष झाले. पण ही त्यांची राजीखुषी दुसऱ्या दिवशीचा लंडनचा सूर्य पाहणार नव्हती. का—ते समजण्यासाठी मि. फॉगबरोबर त्यांच्या क्लबात गेले पाहिजे.

●

# २ पैज लावली

मि. फॉग क्लबची वाट चालत होते. उजवा पाय मोजून ५७५ वेळा पुढे टाकला व डावा पाय ५७६ वेळा पुढे पडला की ते क्लबात पोहोचत.

क्लबात शिरल्याबरोबर ओव्हरकोट, हॅट, काठी तेथल्या नोकराच्या हवाली करून मि. फॉग थेट भोजनगृहात जात. बरोबर बारा वाजून सत्तेचाळीस मिनिटांनी ते जेवण उरकून क्लबच्या हॉलमध्ये येत. तेथे टाइम्स व स्टँडर्ड ही वृत्तपत्रे दुपारच्या चहाची वेळ होईपर्यंत वाचीत. चहा पिऊन सहा वाजायला वीस मिनिटे असताना ते परत हॉलमध्ये येत व 'क्रॉनिकल' वाचीत. अर्ध्या तासात क्लबाचे इतर सभासद येण्यास सुरुवात होई. सगळेच सदस्य प्रतिष्ठित व सधन होते. त्यांपैकी पाचजण मि. फॉगच्या रोजच्या पत्त्यातल्या बैठकीतले

होते. अकरा वाजेपर्यंत पत्ते चालत. बरोबर अकरा वाजता पत्ते खाली टाकून, मि. फॉग ओव्हर-कोट, हॅट, काठी नोकराकडून घेऊन क्लबाबाहेर पडत. साडे अकरा वाजता घर; १२ वाजता ते झोपी जात.

पण तो दोन ऑक्टोबरचा दिवस काही निराळाच ठरला. पहिला डाव वाटतावाटताच गोष्टी निघाल्या, तुकत्याच लंडनमध्ये एका बँकेवर पडलेल्या दरोड्याच्या. पचावन्न हजार पौन्ड मुख्य कॅशिअरच्या टेबलावरून पळवून चोराने दडी मारली होती. आज तीन दिवस गावात, वृत्तपत्रांत हीच चर्चा चालली होती. कोण असेल हा बिलंदर चोर? पकडला जाईल की नाही? केव्हा व कसा पकडला जाईल?

' अरे जाऊन कुठं जाणार बेटा? नक्कीच पकडला जाईल तो आज उद्या. ' मि. राल्फ म्हणाले

' कुठे जाईल म्हणजे? जग खूप मोठं आहे, महाशय. ' मि. स्टुअर्ट म्हणाले.

मि. फॉग पुटपुटले, ' मोठं होतं म्हणा. '

' काय म्हणालात? मोठं होतं? म्हणजे आता जग लहान झालंय की काय? ' मि. स्टुअर्टनी विचारणा केली

' अर्थातच! ' मि. राल्फ म्हणाले, ' मि. फॉग म्हणतात ते काही खोटं नाही. अहो, शंभर वर्षांपूर्वी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जायला जेवढा वेळ लागत असे, त्याच्या दहाव्या हिश्श्याने सुद्धा लागत नाही आता. तेव्हा चोराचा पाठलाग होऊन तो तातडतोब पकडला जाईल यात शंकाच नाही. '

' अरे पण तुमचा हा युक्तिवाद चोरालाही लागू आहे की! तो पण तितक्याच झटपट पळू शकेल ना! ' मि स्टुअर्ट म्हणाले.

' मि. स्टुअर्ट, पानं टाका झटपट. निष्फळ वादाला आळा घालीत, मि. फॉग म्हणाले.

पण मि. स्टुअर्टना वादाचा पिच्छा पुरवायचा होता.

' जग लहान झालंय म्हणा तुम्ही, ' मि. स्टुअर्ट म्हणाले,

'पण आज साऱ्या जगाचा प्रवास किंवा पृथ्वीप्रदक्षिणा करायची म्हटलं तर, तीन महिन्यांपेक्षा कमी दिवस नक्कीच पुरायचे नाहीत'

'ऐंशी दिवसांत करता येईल पृथ्वीप्रदक्षिणा.' मि. फॉग म्हणाले.

'हो ना.' मि. सुलिवन म्हणाले, 'अहो, आजच्या मॉर्निंग क्रॉनिकलमध्ये पृथ्वीप्रदक्षिणेचं वेळापत्रकच छापून आलं आहे. हे पहा कात्रणच आहे माझ्या खिशात.'

खिशातुन कात्रण काढून मि. सुलिवन ते मोठ्याने वाचू लागले ऐका !

लंडन ते सुएझ – ७ दिवस ( आगगाडी व बोट)
सुएझ ते मुंबई – १३ दिवस ( बोट )
मुंबई ते कलकत्ता – ३ दिवस ( आगगाडी )
कलकत्ता ते हाँगकाँग – १३ दिवस ( बोट )
हाँगकाँग ते योकोहामा – ६ दिवस ( बोट )
योकोहामा ते सॅनफ्रॅनसिस्को – २२ दिवस ( बोट )
सॅनफ्रॅनसिस्को ते न्यूयार्क – ७ दिवस ( आगगाडी )
न्यूयॉर्क ते लंडन – ९ दिवस ( बोट व आगगाडी )
करा बेरीज. झाले की नाही ऐंशी दिवस ?


'कागदावर झाले ! पण अरे, गाड्यांना उशीर होणे, बोटी वादळामुळे रेंगाळणे, त्यामुळे योजलेल्या गाड्या, बोटी चुकणे– याचा काही विचार कराल की नाही ?' मि. स्टुअर्ट म्हणाले.

'ते सगळे विचारात घेऊनच ऐंशी दिवसांचा हिशोब केला आहे.' मि. फॉग म्हणाले.

'अरे, पण खेळा ना चट्‌चट्, हे शेवटचे दोन हात माझे– मी जिंकलो– काढा पैसे.'

मि. स्टुअर्ट नव्या डावासाठी पत्ते पिसीत म्हणाले,

'सांगितले ना मघाशी हे सगळे कागदाचे घोडे नाचवण्यासारखं आहे. पैज मारतो मी–चार हजार पौंडांची–ऐंशी दिवसात पृथ्वीप्रदक्षिणा करणं कुणालाही शक्य होणार नाही.'


कॅनडा
सॅनफ्रॅन्सिस्को
गोल्डन
शिकागो
अमेरिका
न्यूयॉर्क
जनरल ग्रँट
हेनरिएटा
डब्लीन
लंडन
लिव्हरपूल
डोव्हर
तुरीन
युरोप
ब्रिंडीसी
सुवेझ
आशिया
आफ्रिका
एडन
मुंबई
अलाहाबाद
बनारस
कलकत्ता
सिंगापूर
हाँगकाँग
शांघाय
योकोहामा
मंगोलिया
दक्षिण अमेरिका
पॅसिफिक महासागर
अटलांटिक महासागर
हिंदी महासागर
ऑस्ट्रेलिया
६२ का दिवस सॅनफ्रॅन्सिस्को
६६ का दिवस
७० का दिवस न्यूयॉर्क
८० का दिवस लिव्हरपूल
१२ का दिवस एडन
२६ का दिवस कलकत्ता
३५ का दिवस हाँगकाँग
४२ का दिवस योकोहामा

' अगदी सहज शक्य होईल ! ' आपल्या वाटणीचे पत्ते उचलीत मि. फॉग म्हणाले

' मग दाखवा पाहू तुम्ही अशी पृथ्वीप्रदक्षिणा करून ! ' मि. स्टुअर्ट आता हट्टालाच पेटले.

' ठीक, स्वीकारलं आव्हान तुमचं. ' मि. फॉग अगदी शांत होते.

' काय, चेष्टा करता की काय ? चला, आपली पानं उचला सगळेजण झटपट. ' मि. राल्फ म्हणाले.

मि. स्टुअर्टने आपली पाने हातात घेतली —

पण लगेच ती खाली ठेवीत ते म्हणाले,

' एकदा उच्चारलेली पैज मी मागे घेत नसतो कधी. ' मि. स्टुअर्ट तीव्र आवाजात पुढे म्हणाले, ' मि. फॉग, तुम्ही माझं आव्हान स्वीकारलंत ना ? पैज ठरली चार हजार पौंडांची. '

अर्थात स्वीकारलं. मि फॉग शांतपणे म्हणाले. ' माझी पैज वीस हजारांची. '

' अरे अरे ! अजून जरा विचार करा. ' मि. सुलिवन म्हणाले. एखाद्या दिवसाचा, नव्हे एखाद्या तासाचा जरी उशीर झाला, तरी वीस हजार पौंड गमावून बसाल. '

' माझ्याकडून तासाचा तर काय, पण एका मिनिटाचा सुद्धा उशीर होणार नाही. ' मि. फॉग संथपणे म्हणाले.

' अहो, पुरे, पुरेत चेष्टा आता. पाचीजण ओरडले.

' प्रतिष्ठित माणूस गंभीर गोष्ट कधी चेष्टेवर नेत नाही. ' गंभीरपणे मि. फॉग म्हणाले

अच्छा तर मग. ' आता सगळेच इरेस पडले, पाचांनीही प्रत्येकी चार हजार पौंडांची पैज मारली.

मि. फॉग पैज जिंकले तर या पाची जणांचे मिळून वीस हजार पौंड त्यांना मिळावयाचे होते; आणि जर ते हरले, तर त्यांनी दिलेले वीस हजार पौंड पाच जणांनी वाटून घ्यावयाचे.

' ठरले तर मग ! डोव्हरची गाडी रात्री ८॥। ला निघते. त्या गाडीने निघतो मी—' मि. फॉग म्हणाले.

' काय आजच रात्री ? ' सगळे आश्चर्याने ओरडले.



'हो. चांगल्या कामाला उशीर कशाला?' बोलता बोलता मि. फॉगनी खिशातली डायरी बाहेर काढली. 'आज बुधवार २ ऑक्टोबर. मी लंडनला, या इथे क्लबात, या खोलीत २१ डिसेंबरला शनिवारी संध्याकाळी ८॥। वाजता पृथ्वीप्रदक्षिणा पुरी करून हजर होईन. जर ठीक त्या क्षणाला मी आलो नाही तर माझे बँकेतील वीस हजार पौंड तुमचे पाच जणांचे. हा आताच त्या तारखेचा चेक लिहून देतो.'

क्लबच्या नोटपेपरवर पैजेचा सारा तपशील लिहून सहाही जणांनी त्यावर सह्या केल्या व तो कागद क्लबच्या अध्यक्षाच्या स्वाधीन केला.

'तर मग अर्धाच टाकू या का हा आताचा डाव? साताचे ठोके ऐकलेत ना? तुम्हाला प्रवासाची तयारी करण्यासाठी घरी जायला हवे. डोव्हरची ८॥। ची गाडी गाठायची आहे ना?'

मि. फॉग म्हणाले,

'नेहमी तयारच असतो मी. नवी अशी काही तयारी करावी लागणार नाही. डाव पुरा करू या. चला, मि. स्टुअर्ट, तुमची पहिली बोली.' थंडपणे मि. फॉग म्हणाले व डाव सुरू झाला.

## ३ पृथ्वीप्रदक्षिणेला आरंभ

सात वाजून पंचवीस मिनिटांनी डाव संपवून मि. फॉग उठले व मित्रांचा निरोप घेऊन क्लबाबाहेर पडले. आज त्यांनी वीस गिनी जिंकल्या होत्या. पंचवीस मिनिटांत म्हणजे रोजच्यापेक्षा जरा जलद पाय उचलीत ते घरी येऊन पोचले.

त्यांनी दुसऱ्यांदा घंटा वाजवली तेव्हा आश्चर्यचकित झालेल्या धडपडेने दार उघडले

आत प्रवेश करीत मि. फॉग म्हणाले,

'मला दोनदा घंटा वाजवावी लागली.'

' पण मालक तुमची रोजची घरी यायची वेळ झालेली नाही म्हणून मला वाटलं रस्त्यावरल्या कुणी वात्रट पोरानं घंटा वाजवली असावी.' खिशातले घड्याळ बाहेर काढून त्यात पाहात धडपडे म्हणाला.

' हं हे पहा धडपडे, दहा मिनिटांत आपण डोव्हरला जायला निघणार आहो.'

धडपडेची मुद्रा बावळट झाली.

' म्हणजे, मालक, तुम्ही कुठे बाहेरगावी निघाला आहा ? '

' हो आपण दोघेही. आपण पृथ्वीप्रदक्षिणा करायला निघणार आहो '

धडपडेचे डोळे थिजले. हातपाय गळाठले.

' पृथ्वीप्रदक्षिणा ! ' कसेबसे लडबडत त्याच्या तोंडातून शब्द आले.

' हो. बरोबर ऐंशी दिवसांत पुरी करायला हवी ही पृथ्वी-प्रदक्षिणा तेव्हा आता एक मिनिटही फुकट दवडता कामा नये.

' पण सामानसुमान बांधायला तर वेळ हवा ना ? ' क्षीण आवाजात धडपडे म्हणाला.

' फक्त एक छोटीशी बॅग. माझे दोन शर्ट व तीन पायमोज्यांच्या जोड्या बस्स. तेवढंच तुझ्याही बॅगेत भर. बाकी जे काय लागेल ते वाटेत विकत घेता येईल रेनकोट, एक ब्लँकेट, तुझे बूट चांगले जाडजूड मजबूत असू देत. बाकी आपल्याला चालायला असं फार लागणारच नाही म्हणा.'

बिचाऱ्या धडपड्याच्या तोंडून शब्दच निघेना. आपल्या खोलीत जाऊन दोन शर्ट व तीन पायमोजांच्या जोड्या बॅगेत ठेवीत तो केविलवाण्या स्वरात आपल्याशी पुटपुटला,

' हं ऽऽ ! वाटलं होतं इथं शांत, स्वस्थपणे काही दिवस राहाता येईल. पण कसचं काय – अन् कसलं काय ! आमच्या पाया-वर पडलेलं चक्र अजून कायमच आहे ! '

मग स्वतःला जरा सावरीत तो म्हणाला,

' छे, पृथ्वीप्रदक्षिणा कसली करताहेत डोंबलाची ! चेष्टा

करीत असणार मालक माझी. फार फार तर पॅरिसपर्यंत जातील अन् येतील झालं परत. वरवशे दिसताहेत—ते कसले पायाला भिंगरी बांधून ऐंशी दिवस फिरताहेत!'

पाच मिनिटांनी दोघांची तयारी झाली. मि. फॉगनी ब्रॅडशॉचे युरोपमधील प्रवासाचे गाईड बरोबर घेतले होते. आपल्या बॅग-मध्ये नोटांचे एक भले मोठे पुडके ठेवीत ते धडपडेला म्हणाले.

'हं संभाळा ही बॅग प्रवासात नीट जपा हिला. वीस हजार पौंड आहेत हिच्यात.

धडपडेचे डोळेच फाटले. काळीज धडपडून छाती बाहेर येते की काय असे वाटू लागले.

ही काय थट्टा चालली आहे!—की हा—हा खराच माथे-फिरूपणा आहे!

घराची दारे नीट बंद करून स्वाऱ्या घोडागाडीतून स्टेशनवर आल्या. मालकाच्या सांगण्यावरून पहिल्या वर्गाची दोन डोव्हरची तिकिटे धडपडेने काढली तेवढ्यात पोराला पोटाशी धरून एक भिकारीण पुढे आली व तिने मि. फॉगपुढे हात पसरला. मि. फॉगनी तावडतोब खिशातल्या पाकिटातून वीस गिनी काढल्या व त्या तिच्या हातावर ठेवीत ते म्हणाले,

"बरं झालं तू भेटलीस ते. नाहीतर आजचा दानधर्म राहून गेला असता.'

धडपडेने हे दृश्य पाहिले व मालकाविषयीच्या आदराने व प्रेमाने त्याचे हृदय भरून आले. तो मनाशी म्हणाला,

'विक्षिप्त, भलत्याच शिस्तीचा असेल— पण माणूस आहे मात्र दिलदार!'

फलाटावर मि. फॉगचे क्लबमित्र उभे होते. त्यांच्याशी हस्ता-दोलन करीत मि. फॉग म्हणाले,

'बराय् मंडळी. भेटूच आता ऐंशी दिवसांनी. हा माझा पासपोर्ट पाहा. प्रवास करताना ठिकठिकाणी संबंधित कर्मचाऱ्यांचे शिक्के (Visa) यावर मी मारून घेत जाईन. म्हणजे तुमची खात्री पटेल की त्या सर्व ठिकाणाहून मजल मारीत मी

प्रवास पुरा केला म्हणून.'

'छे, छे. असे ठिकठिकाणी शिक्के मारून घेण्याची काही गरज नाही हो. तुमच्यासारख्या नेकदार, प्रतिष्ठित माणसाचा शब्द हाच पूर्ण खात्रीलायक शिक्का आहे.' मि. स्टुअर्ट म्हणाले.

'तरी पण व्यवहाराला आपलं पक्कं असावं, हे बरं. अच्छा!'

'बराय्.' तितक्यात गाडी सुटली.

पृथ्वीप्रदक्षिणा सुरू झाली.

अर्ध्या तासाने डुलकी घेता घेता धडपडे एकदम दचकून ओरडला.

'बाप रे, घात झाला—'

'काय झालं?'

'माझ्या खोलीतला गॅसचा दिवा विझवायला विसरलो मी.'

'अस्सं? ऐंशी दिवसांचं त्या गॅसचं बिल तुला तुझ्या पगारा-तून भरावं लागेल, परत गेल्यावर—'

फॉग शांतपणे म्हणाले व ब्रॅडशॉचे गाइड चाळू लागले.

# ४ पाठलाग

मि. फॉग आता सुएझच्या वाटेवर होते. डोव्हरला त्यांनी मंगोलिया बोट पकडली होती. त्यांचा प्रवास संथपणे सुरू होता. पण इकडे लंडनमध्ये मात्र धमाल उडून गेली होती.

जो तो या अजब पृथ्वीप्रदक्षिणेची व तीवर लागलेल्या पैजेची चर्चा करीत होता. या गोष्टीवर वृत्तपत्रात अग्रलेख लिहिले जात होते. प्रवास ऐंशी दिवसात पुरा होईल की, नाही यावरून साऱ्या लंडनमधले लोक आपापसात पैजा मारीत होते. बहुतेक लोक 'ही गोष्ट अशक्य आहे.' या मताचे होते.

—'अहो, आगगाड्या लेट होतात, पुढच्या गाड्या चुकतात, बोटी समुद्राच्या तालावर मागेपुढे पोचतात. एवढा मोठा प्रवास तो का असा तासा-मिनिटांच्या काट्यांवर होणार आहे?'

...लोक म्हणत होते.

पण झाडून सगळ्या स्त्रिया मात्र मि. फॉगच्या बाजूच्या होत्या. स्त्रियांना स्वभावतःच साहस आवडते ना! डेस्टियोना नाही का अयोलोच्या साहसांना भुलली व तिने आपला कोमल, गोरा हात त्याच्या राकट काळ्याकुट्ट हातात दिला? शिवाय मि. फॉग यांचा जो फोटो वृत्तपत्रात छापून आला होता, त्यात ते किती देखणे, रुबाबदार दिसत होते! मग का नाही स्त्रिया त्यांची बाजू घेणार?

पण इतक्यात एक सनसनाटी बातमी साऱ्या वृत्तपत्रांत छापून आली व साऱ्या पैजांवर व चर्चांवर पाणी फिरविल्यासारखे झाले. बातमी पुढीलप्रमाणे होती—

लंडन येथील पोलीस मुख्याधिकाऱ्यांना डिटेक्टिव फिक्स यांची पुढीलप्रमाणे तार आली आहे.

' मी बँकचोराचा पाठलाग करीत आहे. मुंबई मुक्कामी त्याला पकडता यावे म्हणून ' फिलिअस फॉग ' या नावाने पकड-समन्स पाठवून द्यावे.'

झाले. मि. फॉगच्या कौतुकाला पार ओहोटी लागली. आता लोक त्यांच्याबद्दल वाट्टेल ते बोलू लागले.

' संभावित दिसणारा, कुणाच्या अध्या मध्यात आज कित्येक वर्षे नसलेला हा गृहस्थ अट्टल चोर होता तर! तरीच बेटा असा अचानक पळून गेला — म्हणे पृथ्वीप्रदक्षिणा! नुसतं निमित्त पळ काढायला. एवढी भली मोठी पैज मारून कुणी विनाकारण असले वेडे साहस करील काय? छान होईल मुंबईला पकडला गेला तर! अहो, थोडे थोडके नाही, पंचावन्न हजार पौंड लंपास केले आहेत गुलामाने. फोटो पाहाताच ओळखला आम्ही त्याला. फॉगच तो. मोठ्या गुर्मीत पावले टाकीत जातो ना क्लबात. मिळू दे त्या फिक्सला चार हजार पौण्डांचे बक्षीस. आम्हीसुद्धा देऊ त्याला एखादा पौण्ड, एवढे महत्कार्य केल्याबद्दल.'

इकडे सुएझ बंदरावर फिक्स डिटेक्टिव मंगोलिया बोट धक्क्याला लागण्याची वाट पहात होता. नऊ ऑक्टोबरची सकाळ

होती ती. अकरा वाजता बोट येणार होती. घड्याळाकडे पाहात तो अस्वस्थपणे येरझारा घालीत होता. मधेच तो बंदरावरच्या ब्रिटिश कॉन्सलच्या कचेरीत जाई.

' पकडसमन्स माझ्याजवळ नाही हो. पण काहीतरी करून त्या फॉगला इथे अडकवून ठेवा. वॉरंट घेतो मागवून मुंबईहून,

पण कॉन्सल उत्तर देई.

' अहो, खराच चोर असला तर, बोटीवरून उतरेल कशाला तो खाली ? सुएझला पासपोर्टावर शिक्का मारावा लागत नाही.'

पण बोट बंदराला लागताच मि. फॉग धडपडेला घेऊन कॉन्सलच्या कचेरीत आले. फिक्स त्यांच्या पाठोपाठ होताच फोटोवरून त्याने उतारूंच्या गर्दीतून त्यांना केव्हाच टिपले होते.

कॉन्सलला अभिवादन करून मि. फॉग म्हणाले,

' या माझ्या पासपोर्टवर कृपा करून आपल्या कचेरीचा शिक्का माराल का ? '

मि. फॉगच्या रुबाबदार व्यक्तिमत्वाची. कॉन्सलवर एकदम छाप पडली.

आनंदाने,' ते म्हणाले, ' पण मि. फॉग, सुएझचा शिक्का पासपोर्टवर घेण्याची जरूर नसते.'

माहीत आहे मला ते. पण मी सुएझवरून गेलो याचा पुरावा म्हणून शिक्का मारून हवा आहे मला.'

कॉन्सल बुचकळ्यात पडला. पण त्याने शिक्का मारून दिला. फिक्स मनात म्हणाला,

बेट्याने पृथ्वीप्रदक्षिणेची बतावणी चालू ठेवली आहे. प्रवासाचा पुरावा हवा म्हणे. '

मि. फॉग गेल्यावर कॉन्सल फिक्सला म्हणाले.

' पाहिलेत ! किती भारदस्त माणूस आहे ? तुम्ही भलतीच शंका घेता आहा तो चोर असल्याबद्दल. '

' अट्टल बदमाश असे संभावितच दिसतात व लोक फसतात.

पण मी आहे चोरावर मोर. हा पाहा मला पाठविण्यात आलेला फोटो. जुळतोय की नाही फॉगच्या चेहेरेपट्टीशी ?'

'अहो, फोटोवर जाऊ नका,' कॉन्सल म्हणाले, 'माणसा-सारखी माणसं पुष्कळ आढळतात.'

पण फिक्स फॉगचा पिच्छा सोडणार नव्हता.

मि. फॉग बोटीवर निघून गेले होते. धडपडे मात्र काही खरेदी करायला गावात निघाला होता. फिक्सने त्याला गाठले.

'बाजारात निघाला वाटतं ? चला मी नेतो तुम्हाला खात्रीच्या दुकानात. प्रवाशांना भारी लुबाडतात इथले दुकानदार.'

धडपडेशी ओळख वाढवून फिक्सला त्याच्याकडून फॉगची माहिती काढायची होती.

धडपडे मूळचा बडबड्याच. मालक मितभाषी असल्यामुळे त्याच्या तोंडाला अगदी चिकटा आला होता. तेव्हा फिक्सच्या प्रश्नांना अघळपघळ उत्तरे द्यायला तो तयारच होता. त्याने दिलेल्या माहितीने फिक्स हुरळूनच गेला.

इतक्या घाईने प्रवासाला निघाले ! बरोबर सामान काही नाही !! अव्वाच्या सव्वा पैसे बरोबरच्या बॅगेत !!!

नक्कीच बँकेवर दरोडा घालणारा चोर तो हाच– फॉग !!!

सुएझहून बोट सुटली तेव्हा फिक्स बोटीवर होता.

मि. फॉग केबिनबाहेर क्वचित्‌च पडत. फक्त जेवण-खाण करण्याकरिता भोजनगृहात व पत्ते खेळायला लाउंजमध्ये ते जात. बाकीचा वेळ ते आपल्या खोलीत असत. प्रवासाचे वेळापत्रक कसोशीने लिहून काढण्यात व जास्त-कमी वेळ कुठे लागला, याच्या नोंदी करण्यात ते गढून गेलेले असत. हातांतील घड्याळाप्रमाणे ते मिनिट–तास–दिवस यांचा हिशेब ठेवीत.

आतापर्यंतचा प्रवास अगदी वक्तशीर झाला होता. कुठे उशीरही झाला नव्हता व कुठे वेळेच्या आधी टप्पाही गाठला गेला नव्हता. पण सुएझहून बोट सुटल्यावर मि. फॉग कप्तानाला म्हणाले—

'वेळेच्या आधी जितके तास तुम्ही मुबई गाठाल तितक्या प्रमाणात मोठे बक्षीस मी तुम्हाला देईन.'

१४ ऑक्टोबरला बोट एडनला आली. तेथे कोळसा भरून घ्यायला चार तास मोडले. पण मि. फॉगनी ते हिशेबात धरले होतेच. शिवाय कप्तानाने बक्षिसावर नजर ठेवून, पंधरा तारखेला सकाळी पोहोचणारी बोट चौदा तारखेला संध्याकाळीच एडनला आणली होती.

मि. फॉगनी आपल्या वेळापत्रकाच्या तक्त्यात पंधरा तास वाचविल्याची नोंद केली. बंदरावरच्या संबंधित कचेरीत जाऊन त्यांनी आपल्या पासपोर्टवर एडनचा शिक्का मारून घेतला. गावात हिंडण्या-फिरण्यात त्याना रस नव्हताच. बोटीवर परत येऊन ते पत्ते खेळत बसले. धडपडे खरेदीसाठी बाजारात भटकत होता. धडपडेला आता माणसांची, नवेनवे मुलुख, लोक पाहाण्यात मजा वाटू लागली होती. खुषीत होती अगदी स्वारी.

एडनहून बोट सुटल्यावर, अनुकूल हवामानाच्या मदतीने झपाट्याने प्रवास करीत, २० ऑक्टोबरला दुपारी ती मुंबईच्या किनाऱ्याला लागली.

कप्तानाला दोन दिवस आधी बोट मुंबईला आणल्याबद्दल भरपूर बक्षिशी मि. फॉगनी दिली व दोन दिवस वाचल्याची नोंद आपल्या डायरीत केली.

## ५. धडपडेने बूट गमावले

मंगोलिया बोट आज दुपारी ४॥ वाजता मुंबईला पोचली होती. कलकत्याची आगगाडी रात्री ८ वाजता सुटणार होती. मि. फॉग थेट ब्रिटिश वकिलातीत गेले व त्यांनी आपल्या पासपोर्टवर तेथील शिक्का मारून घेतला. त्यांना मुंबईतील प्रेक्ष-

णीय स्थळे पाहायचीच नव्हतीच. ते बोरीबंदर स्टेशनावरील भोजनगृहात गेले व त्यांनी खाना मागविला.

घडपडे मात्र खरेदी करण्यासाठी व मुंबई पाहाण्यासाठी निघाला. वेळेवर स्टेशनवर यायला मि. फॉगनी त्याला बजावले होतेच.

फिक्सची मात्र फारच तारांबळ उडाली होती. बंदरावर उतरल्याबरोबर तो थेट मुख्य पोलीस अधिकाऱ्यांच्या कचेरीत गेला. पण पकडवॉरन्ट अजून लंडनहून आलेच नव्हते. फिक्सची भयंकर निराशा झाली. लंडनच्या पोलीस-खात्याला तो मनातल्या मनात शिव्यांची लाखोली वाहू लागला. तो मुंबईच्या पोलीस प्रमुखांना म्हणाला,

'तुम्हीच का नाही काढीत वॉरंट फॉगच्या नावाचे ?

पोलीसप्रमुख म्हणाले,

'अहो, मि. फॉग लंडनचे नागरिक. हिंदुस्थानातल्या पोलीस-खात्याला त्यांना पकडण्याचा अधिकारच नाही.'

फिक्सचा नाईलाज झाला. कलकत्याचे तिकीट काढायला तो घाईघाईने बोरीबंदर स्टेशनवर गेला. लंडनहून वॉरंट आले की, ते कलकत्याच्या पोलीस कचेरीकडे ताबडतोब पाठवायला पोलीसप्रमुखांना त्याने पुनःपुन्हा बजावून सांगितले.

इकडे घडपडे खरेदी झाल्यावर मुंबई पाहात इकडे तिकडे भटकू लागला. टाउन-हॉल, म्यूझियम, मोठ्या मशिदी, चर्चेस, रस्त्यांतून चित्र-विचित्र पोशाख करून हिंडणारे लोक, कानांवर पडणाऱ्या निरनिराळ्या भाषा—सगळ्यांनीच त्याची खूप करमणूक होत होती. फिरता-फिरता तो एका भव्य दगडी इमारतीसमोर आला. उंच घुमटावर चकचकणारा सोन्याचा कळस, त्यावर फडफडणारे भगवे निशाण, आतबाहेर करणाऱ्या लोकांची गर्दी, आतून येणारा वाद्यांचा व समूहगानांचा गोंगाट यांनी त्याचे कुतूहल जागृत झाले व तो पुढच्या प्रवेशद्वारातून आत शिरला. आत गेल्यावर देवळातल्या लहान-लहान मूर्ती, भिंतीवर कोरलेले भव्य देखावे हे पाहाण्यात तो गुंग होऊन गेला.

आणि एकदम त्याला धक्के मारून कुणीतरी जमिनीवर पाडले. भगवे कपडे घातलेले तीन इसम त्याचे बूट-मोजे ओरबाडून काढीत होते. त्याची हॅट पार भिरकावली गेली होती, खरेदी केलेल्या वस्तूंची पुडकी इकडे तिकडे विखरून फुटली होती व आतल्या वस्तू बाहेर सांडत होत्या.

धडपडे पहिल्यांदा गांगरून गेला. पण लहानपणी मेहनत करून कमविलेले त्याचे शरीर त्याला काय मुकाट्याने राहू देणार ? तो लाथा झाडू लागला व उठून त्या काटकुळ्या संन्याशांना ठोसे मारू लागला. ते त्याला पकडून ठेवू पाहात होते; पण थोड्याच वेळात आपली सुटका करून घेऊन धडपडेने स्टेशनकडे धूम ठोकली. संन्याशी त्याच्यामागे रस्त्यातून धावू लागले. रस्त्यातील लोक, त्यांच्यात फिक्स होताच– कारण धडपडेचा पिच्छा पुरविण्याचे त्याचे धोरण चालू होतेच– संन्याश्यांच्याबरोबर धावत होते.

देवळात काय प्रकार घडला याची चर्चा भोवतालचे लोक करीत होते. फिक्सला ती सारी हकीगत ऐकून हर्षवायूच झाला.

संन्याशांशी मारामारी ! देवळाच्या नियमांचा भंग ! हा गुन्हा हिंदुस्थानातल्या मुलुखात घडला आहे. आता सापड-लात बच्चंजी माझ्या तडाक्यात !' तो घाईघाईने देवळातल्या संन्याशांना घेऊन पोलीस चौकीत फिर्याद नोंदवायला निघाला. त्यादिवशीची गाडी भले चुकेल. पण नंतरच्या गाडीने कल-कत्त्यात गुन्हेगारांना गाठण्याचा बेत फिक्सने मनाशी पक्का करून टाकला.

इकडे धावत धावत आठला पाच मिनिटे कमी असताना धडपडे स्टेशनवर येऊन थडकला. मि. फॉग आपल्या डब्यात जाऊन बसले होते,

धापा टाकीत धडपडे घडलेली हकीगत सांगू लागला. त्याचा अवतार पाहाण्याजोगा होता. कपडे धुळीने भरलेले, फाटलेले; पायात, डोक्यावर काही नाही, केस पिंजारलेले, चेहेऱ्यावर

रक्ताळलेले ओरखडे, डोळे तांबारलेले. मि. फॉगनी संथपणे धडपडेकडे बघितलं.

' पुन्हा असा प्रकार घडता कामा नये. '

ते शांतपणे म्हणाले व त्यानी ब्रॅडशॉचे गाइड चाळायला सुरुवात केली.

गाडी वेळेवर सुटली. डब्यात सर फ्रॅन्सिस नावाचे एक लष्करी अधिकारी होते. त्यांना बनारसला जायचे होते. ते हिंदुस्थानात बरीच वर्षे असल्यामुळे तेथील लोकांच्या चालीरीती त्यांना बऱ्याचशा ठाऊक होत्या. धडपडेची हकीगत ते ऐकत होतेच.

गाडी सुटल्यावर ते मि. फॉगना म्हणाले,

' तुमचा नोकर बूट घालून मंदिरात गेला म्हणून ते संन्याशी चिडले असावेत. देवळाचे नियम मोडले त्याने. शिवाय त्याने संन्याशांना मारहाणही केली म्हणता ! चक्, चक् तुम्हाला या गोष्टीचा त्रास होईल अशी भीती वाटते मला. जोडे-बूट बाहेर काढून ठेवून हिंदू लोक आपल्या पवित्र देवळात जातात. संन्याशांना तर ते फार फार मानतात.

पण मि. फॉगनी नुसती तुच्छतेने मान उडविली. खरे म्हणजे त्यांनी सर फॉन्सिसचे बोलणे नीट ऐकलेच नव्हते. त्यांचे सारे लक्ष तासांच्या व दिवसांच्या दिशेकडेच होते.

गाडी धावतच होती. नाशिक गेले, बऱ्हाणपूर आले, तिथे धडपडेने नक्षीचे हिंदुस्थानी चढाव खरेदी केले व ते मोठ्या ऐटीने पायात चढविले.

मारामारीचा धडपडेला आता विसर पडला होता. खिडकीतून डोंगर, नद्या, झाडी व स्टेशनवरील माणसांची चित्रविचित्र गर्दी पाहाण्यात त्याला फार मौज वाटत होती. आपल्या मालकाच्या साहसी माणसाबद्दलही आता त्याला फारच कळकळ वाटू लागली होती. गाडी एखाद्या स्टेशनवर जरा जास्त वेळ उभी राहिली की, तो कासावीस होई. कलकत्त्याला गाडी वेळेवर पोचली नाही तर हाँगकाँगची बोट चुकेल की !

मग ऐंशी दिवसात पृथ्वीप्रदक्षिणा कशी पुरी होणार ? अन् मग बसली का वीस हजार पौंडांची खोट !

जणू त्याच्या खिशातूनच ते वीस हजार पौंड जाणार होते.

२२ ऑक्टोबरला सकाळी धडपडेने आपले चांदीचे घड्याळ खिशातून बाहेर काढले व तो म्हणाला,

'तीन वाजले आहेत– पण चांगलेच उजाडले आहे की !'

खरे वाजले होते सकाळचे सात.

काय गंमत झाली होती आले का लक्षात ? धडपडेचे घड्याळ दाखवित होते, लंडनमधला म्हणजे ग्रीनिच-टाइम. पण ते सारे प्रवास करीत पूर्वेला चालले होते. त्यामुळे प्रत्येक रेखांशाला सूर्य चार मिनिटे लवकर उगवून दिवस आखूड होत होते. यावेळी ग्रीनिचपासून ते ६०-७०° पूर्वेस असल्यामूळे ते चार तास ग्रीनिचच्या पुढे होते.

सर फ्रॉन्सिसने आपले घड्याळ धडपडेला दाखविले व वेळांमध्ये फरक का पडतो हे मनापासून सांगण्याचा प्रयत्न केला.

पण धडपडेच्या डोक्यात फारसा प्रकाश पडला नाही. आपलेच घड्याळ बरोबर आहे, बाकीची चुकीची आहेत हा त्याचा हट्ट कायम होता.

मि. फॉगचे याही संवादाकडे लक्ष नव्हते. ते नेहमीप्रमाणे आपल्याच विचारात मग्न होते.

पण मग त्यांना आपल्या विचाराच्या तंद्रीतून बाहेर यावे लागले. कारण सकाळी आठ वाजता आगगाडी अचानक थांबली व ती पुढे सरकण्याचे लक्षण दिसेना.

## ६. हत्तीवर स्वारी

धडपडे खाली उतरला व इंजिनड्रायव्हरला व गार्डला भेटून त्याने बातमी काढली.

'रेल्वे लाइन इथपर्यंतच आहे; अजून पुरी झाली नाही. अलाहाबादेपर्यंत रूळ घातलेलेच नाहीत अजून.'

सर फ्रॅन्सिस चिडून गार्डकडे गेले व तावातावाने आरडू लागले.
'याचा अर्थ काय? आमच्याकडून तिकिटाचे पैसे तर थेट-पर्यंत वसूल केले मुंबईलाच. अन् आता म्हणे पन्नास मैलांच्या रस्त्यावर रुळच नाहीत. आम्हाला मुंबईलाच का नाही याची कल्पना दिली?'

गार्ड पण चिडला.

'तुम्हीच का नाही नीट चौकशी केलीत मुंबईला? हे बाकीचे उतारु पाहा उतरून, सामानसुमान घेऊन, काही तरी वाहन मिळविण्याच्या खटपटीला लागलेत— त्यांना चांगली कल्पना होती याची आधीच—'

सर फ्रॅन्सिस आणखीन्च चिडून इतर प्रवाशाकडे पाहू लागले. खरोखरीच प्रत्येक उतारू घोडागाडी, बैलगाडी, खेचर— जे मिळेल ते पकडून अलाहाबादेच्या वाटेला लागला होता

पण मि. फॉग अगदी शांत होते. ते म्हणाले,

'चला, सर फ्रॅन्सिस, आपण पण काहीतरी वाहन मिळवू या.'

मि. फॉगचा शांतपणा पाहून सर फ्रॅन्सिस चांगलेच वरमले. धडपडेने आपल्या वडबडीत सांगितल्याप्रमाणे हा इसम वीस हजार पौण्डांची पैज मारून नेमक्या ऐंशी दिवसांत पृथ्वीप्रदक्षिणा करायला निघाला आहे. आता खोटी होत असल्यामुळे त्याची पुढची बोट चुकून तो पैज हरण्याचा संभव आहे, तरीही हा एवढा शांत, आणि आपण मात्र बना-रसला आपले एवढे निकडीचे काम नसूनही रागाने हिरवे पिवळे होतो आहो!

'मि. फॉग' ते म्हणाले, 'या अनपेक्षित अडचणीमुळे तुमच्या पुढल्या प्रवासात गोंधळ होणार अशी भीती वाटते मला.'

'अनपेक्षित असं काही माझ्या हिशेबात नसतंच. अशा काही-अडचणी येणार हे मी गृहितच धरून चाललो होतो. काहीच गोंधळ होणार नाही माझ्या भावी प्रवासात. झालेल्या प्रवासात वाचलेले दोन दिवस हातात आहेत ना माझ्या. हाँगकाँगची बोट सुटणार कलकत्त्याहून २५ तारखेला. तोवर आपण नक्कीच

कलकत्याला जाऊन पोहोचू. चला, काही वाहन मिळते का बघू या.'

पण यावेळेपावेतो बाकीच्या प्रवाशांनी सगळीच उपलब्ध वाहने बळकाविली होती

'काही हरकत नाही.' किंचितही विचलित न होता मि. फॉग शांतपणे म्हणाले, 'चला, आपण चालतच जाऊ. सामान काही फार नाहीच आहे आपले.'

मि. फॉगचे हे शब्द एकून, त्यांचा दृढनिश्चय व स्थितप्रज्ञता पाहून सर फ्रॅन्सिस आश्चर्याने थक्क झाले.

पण तितक्यात धडपडे धडपडत आला अन् म्हणाला.

'एक वाहन आहे मिळण्याजोगे.'

'कुठले, कुठले ?' सर फ्रॅन्सिस उतावीळपणे म्हणाले.

'इथे जवळच एक इसम राहातो, जंगलात तोडलेली लाकडे वाहून नेण्याचं काम करतो– त्याचा हत्ती आहे–'

'चला आपण तो पन्नास मैलांसाठी भाड्याने घेऊ. मि. फॉग म्हणाले व चालू लागले.

पण हत्तीचा मालक हत्तीला इतक्या दूर पाठविण्यास तयार होईना. त्याची लाकडे वाहून नेण्याची मजुरी बुडली असती ना !

मि. फॉगनी त्याला भाड्याच्या पोटी ताशी दहा, पंधरा, वीस पौंड सुद्धा देऊ केले. जसजसा भाड्याचा आकडा वाढत जाई तसतसे धडपडेच्या पोटात जास्तजास्त धाकधूक होई. कारण प्रवास निदान पंधरा तासांचा तरी होता.

पण हत्तीचा मालक काही कबूल होईना. शेवटी मि फॉग म्हणाले, 'भाड्याने द्यायचा नसला तर विकत दे तुझा हत्ती मला. एक हजार पौण्ड देतो तुला.'

पण तरीही हत्तीचा मालक दाद देईना. किंमत वाढविता, वाढविता, मि. फॉगनी ती दोन हजार पौण्डांपर्यंत नेली, तेव्हा मात्र त्याचे डोळे पैशाच्या लोभाने चमकू लागले व त्याने तो हत्ती मि. फॉगना विकला.


आता हत्ती चालवायला माहूत पाहिजे. भले मोठे बक्षीस मि. फॉगनी कबूल केल्यावर हत्तीच्या मालकाचा मुलगा अलाहाबादेपर्यंत हत्ती चालवायला तयार झाला.

नऊ वाजता हत्तीवरून सगळ्यांची वरात निघाली. सर फ्रॅन्सिस यांना मि. फॉगनी आपल्याबरोबर नेण्याचे कबुल केले होते. माहुताने हत्तीला अंकुर टोचून भराभरा चालविले होते. त्याला जंगलातील वाटांची चांगलीच माहिती होती. जवळचे रस्ते हुडकून काढीत तो हत्तीस पळवित होता. आमचे धडपडे हत्तीवर खूष होते. हत्तीच्या मालकाकडून त्याने पुष्कळसे साखरेचे खडे विकत घेतले होते. धडपडे मधूनमधून ते हत्तीच्या पुढे करीत होता हत्तीही मोठ्या शिताफीने सोंड वळवित, धडपडेच्या लांबविलेल्या हातातून आपल्या खाऊची वसुली करीत होता.

हत्तीच्या गतीने बसणारे गचके खाऊन सर फ्रॅन्सिस जिकिरीस आले होते. पण मि. फॉग मात्र आरामात बसले होते. थकल्या-भागल्याचे किंवा कंटाळल्याचे एवढे सुद्धा चिन्ह त्यांच्या तोंडावर नव्हते. सर फ्रॅन्सिस मनाशी म्हणाले, ' हा माणूस हाडा-मांसाचा बनलेला आहे की, पोलादाचा ?

अंधार पडू लागल्यावर मंडळींनी वाटेतल्या एका डाक बंगल्यात रात्रीचा मुक्काम ठेवला. यावेळेपावेतो अलाहाबादपर्यंतचे अर्धे अंतर, म्हणजे पंचवीस मैल हत्तीने कापले होते. जेवणखाण करून मंडळी झोपी गेली. सर फ्रॅन्सिस व धडपडे झोपेत मधूनमधून चाळवते होते, मग त्याना काही भीतीदायक स्वप्ने पडत होती की, काय कोण जाणे. मि. फॉग मात्र एखाद्या लहान बालकाप्रमाणे अगदी गाढ झोपी गेले. किवानी हत्ती एका मोठ्या वृक्षाला टेकून उभ्या उभ्याच झोप काढीत होता. त्याचा माहूत त्याच्या शेजारी जमिनीवर कांबळे अंथरून झोपला होता.

उजडताच पुन्हा प्रवासाला सुरुवात झाली. विंध्य पर्वतांच्या उतारांवरून मजल मारीत, दाट जंगलांतून वाट काढीत



अलाहाबादच्या जवळजवळ मंडळी जात होती. संध्याकाळ पर्यंत अलाहाबादला पोहोचण्याची खात्री वाटत होती.

आणि दुपारी चार वाजता किवानी हत्ती एकदम चमकून थबकला. कितीही अंकुश टोचला तरी तो एकही पाऊल पुढे टाकीना.

## ७ भले शाबास, धडपडे !

हत्तीने पुढे जाण्याचे नाकारल्यामुळे सगळेजण खाली उतरले. माहुताने कानोसा घेत सांगितले.

' वाघांचा मोठा गोंगाट ऐकू येतोय्. त्याने हत्ती बुजला आहे बहुतेक. आपण जरा आडोशाला हत्तीला घेऊन उभे राहू या ते. काय गडबड आहे त्याचा शोध घेऊ या. '

व झाडीत लपतात न लपतात तोच एक मोठी मिरवणूकच वाजतगाजत येताना दिसू लागली.

पुढल्या बाजूला ताशे वाजविणारे चालत होते. त्यांच्या मागे माणसांचा मोठा जमाव व मधोमध एक तरुण मुलगी. ती हेलपाटत कशीबशी पावले टाकीत होती. दोघा-चौघांनी तिला हात धरून चालवले होते. या जमावामागे आणखी एक घोळका चालत होता. त्यांच्या मध्यभागी चार माणसे आपल्या खांद्यावरच्या तातीवर एका पुरुषाचा शृंगारलेला मृत-देह घेऊन चालत होती.

मि. फॉगना या प्रकाराचा काहीच बोध होईना पण सर फ्रॅन्सिसना हिंदुस्थानातल्या धार्मिकविधींची व संस्कारांची बरीच माहिती होती. ते सांगू लागले.

' ही कोणा श्रीमंत पुरुषाची प्रेतयात्रा दिसते आहे. ती पुढे चालली आहे ती त्याची बायको असावी. ती सती जाणार आहे. म्हणजे आपल्या नवऱ्याबरोबर ती आपल्याला जाळून घेणार आहे. '

हे ऐकून मि. फॉगच्या अंगावर सरसरून काटा आला, पण सर फ्रॅन्सिस म्हणाले.

' हिंदुस्थानात वरच्या जातीतल्या लोकांत विधवेचे जीवन इतके कष्टमय असते की, तसे दुःखी आयुष्य कंठण्यापेक्षा नवऱ्याबरोबर चितेवर जळून मरणं ती जास्त पसंत करते.

पण माहूत म्हणाला.

' ही बाई मात्र नक्कीच खुषीने सती जात नाहीय्. हिची माहिती आहे आम्हाला ऐकून. हिच्या बापाने पैशाच्या लोभाने हिला एका श्रीमंत म्हाताऱ्याच्या गळ्यात बांधली.

' पण ती तर अगदी अर्धमेली झालेली दिसते आहे दुःखाने धडपडे म्हणाला '

'दुःखाने नव्हे. ' माहूत हसून म्हणाला, ' ती सती जातांना आरडेल-आरडेल, धडपड करील म्हणून तिला अफू चारून गुंगीत ठेवलीय तिच्या नवऱ्याच्या भाऊबंदांनी.

मिरवणूक दूर गेल्यावर मंडळी आडोशातुन बाहेर आली.

' चला, आता निघू या. तुमचा वेळ मोडतो आहे, मि. फॉग. " सर फ्रॅन्सिस म्हणाले.

पण मि. फॉग आपल्या नेहमीच्या शांत स्वरात म्हणाले.

' अं हं. आपण त्या मिरवणुकीच्या मागे जाऊ या. त्या गरीब बिचाऱ्या बाईची आपण सुटका केली पाहिजे. '

काय ? काय म्हणता ? अहो, मि. फॉग, असा वेळ दवडून बोट चुकेल ना तुमची !'

' बारा तास सवड काढू शकतो मी. चला, चढा हत्तीवर. '

सर फ्रॅन्सिस हत्तीवर चढत मनाशी म्हणाले,

' माणूस पोलादाचा असला तरी त्याचं काळीज मात्र लोण्यासारखं मऊ आहे '

हत्ती मिरवणुकीच्या दिशेने दौडू लागला. बाईला कशी सोडवायची याबद्दल सर फ्रॅन्सिस व धडपडे चर्चा करीत होते. काम कठीण होते. कारण मिरवणुकीबरोबर संरक्षणाला हत्यारबंद शिपाई होते. जाता जाता मिरवणुक एका देवळापाशी

थांबली. बाईला घेऊन काहीजण देवळात गेले. बाकीचे देवळापाशी मृतदेह मध्ये घेऊन बसले.

या वेळेपर्यंत चांगलाच काळोख झाला होता माहूत पुढे जाऊन गुपचुप कानोसा घेऊन आला.

' उद्या पहाटे चिता पेटवायचा बेत दिसतो. चितेला अग्नी देणारा मोठा मुलगा अजून आलेला नाही. '

' भोवतालच्या झाडीत आडोशाला आमच्या मंडळींनीही मुक्काम टाकला. देवळाभोवती कडक पहारा असल्यामुळे रात्रीच बाईला सोडविण्याच्या बेतावर पाणी पडले होते. मंडळी निराश झाली होती.

' छे हो. सकाळी तरी एवढ्या मोठ्या जमावातून आपण कसे तिला पळविणार ! ' सर फ्रॅन्सिस कुजबुजले. ' आपण आपल्या वाटेला लागू कसे. '

' बरोबर बोललात साहेब ' माहूत म्हणाला. ' सकाळी यांच्याशी झगडा करायला लागलो तर सगळ्यांच्याच प्राणाशी गाठ. '

पण मि. फॉग अजूनही हिंमत हरायला तयार नव्हते.

' थांबू या उजाडेपर्यंत– सुचेल काहातरी युक्ती. दुपारपर्यंत अलाहाबादला पोचलो तरी तिथे गाडी मिळेल आपल्याला कलकत्त्याची. '

मितभाषी मि. फॉगना फार बोलणे जमत नव्हते. पण त्या बाईला प्राणसंकटात सोडून त्यांचा पाय तिथून निघत नव्हता हे स्पष्ट होते.

थोडा वेळ मनाशी विचार करून मि. फॉगनी धडपडेला एकीकडे नेऊन त्याला काही सांगितले असावे. कारण धडपडे लगेच तिथून निघाला. चिता जिथे रचून ठेवली होती त्या जागेजवळ एक झाड होते. त्या झाडावर चढून धडपडे फांद्यांच्याआड दडून बसला.

लवकरच पहाट झाली. जमाव जागा झाला. हालचाल सुरू झाली. ज्याची वाट पाहात होते तो मुलगा आला असावा, कारण ताशे-ढोल वाजवित, बाईला मध्ये घेऊन जमाव चितेकडे

जाऊ लागला होता.

मृतदेह उंच रचलेल्या चितेवर ठेवला गेला. अर्धमेल्या झालेल्या बाईला त्याच्या शेजारी निजवण्यात आले. बरोबरचे ब्राह्मण मोठ्याने मंत्र म्हणू लागले. वाद्यांचा कडकडाट चालूच होता. मुलाने पुढे होऊन चितेच्या तळाला मशाल लावली. लाकडे धुमसू लागली. धुराचे लोटच्या लोट चितेतून निघू लागले आणि एकदम सगळा जमाव जागच्या जागी भयाने थिजला. ब्राह्मण मंत्र म्हणायचे थांबले. वाद्ये बंद झाली. सगळे डोळे फाडफाडून चितेकडे पाहात होते. धुरामुळे धड काहीच दिसत नव्हते–

पण–पण–चितेवर ही हालचाल कसली ?

मेलेला माणूस जिवंत होऊन उठून बसला की काय !

कोणीतरी वाकून बाईला उचलून घेतली.

' भूत ! भूत ! '

एकच ओरडा झाला. सगळे लोक जीव घेऊन पळत सुटले व देवळात आसरा घेऊ लागले.

तेवढ्यात ते ' भूत ' पळत पळत मि. फॉगच्या जवळ आले व घोगऱ्या आवाजात म्हणाले,

' चला, मालक चला. आता येथून पळ काढला पाहिजे. '

बरोबर ओळखले ते ! आमचे धडपडेरावच होते ते.

धुराच्या लोटांतून ते झाडावरून उतरून चितेजवळ गेले होते व मोठ्या हिमतीने चितेवर चढून त्या बाईला उचलून त्यांनी पळ काढला होता.

मग विजेच्या वेगाने हालचाल सुरू झाली. मुर्च्छित बाईला सांभाळून हत्तीवर घेतले. माहुताने हत्ती भरधाव काढला.

मि. फॉग धडपडेकडे पाहून म्हणाले,

' शाबास, धडपडे. '

दोनच शब्द ! पण मितभाषी फॉगच्या तोंडातले ते दोन शब्द धडपडेला एखाद्या महाकाव्याइतके महत्त्वाचे वाटले.

शेवटी मंडळी अलाहाबादेला जाऊन पोचली.

औडा—हे त्या बाईचे नाव—अफूच्या अंमलातून ती आता जरा सावध झाली होती.
मि. फॉगनी विचारले,
‘ तुम्हाला आता कुठं पोचवायचं ते सांगा. ’
औडाच्या डोळ्यांतून कृतज्ञतेचे अश्रू वाहात होते.
‘ हिंदुस्थानात रहाणं नको वाटतं आता. हाँगकाँगला माझा एक चुलत भाऊ व्यापार करतो. तिकडे जाता येतं का बघते. ’
‘ वा ! छान ! ’ मि. फॉग म्हणाले, ‘ आम्ही हाँगकाँगलाच निघालो आहोत. पोचवून देऊ तिथं तुम्हाला तुमच्या भावाकडे ’
हे ऐकून सर फ्रॅन्सिसचा मि. फॉगबद्दलचा आदर शतगुणित झाला.
पैज जिंकण्याचं एवढं मोठं ओझं डोक्यावर असताना सुद्धा हा थोर माणूस आपली परोपकारी वृत्ती सोडीत नाही अं ! ते मनाशी म्हणाले.
माहुताला निरोप देताना त्याला भरपूर बक्षिसी तर मि. फॉगनी दिलीच, पण तो हत्तीसुद्धा त्याला बक्षीस देऊन टाकला.
‘ मालक ’ माहूत फॉगच्या पाया पडत म्हणाला.
‘ आमची गरिबी पार हटवलीत तुम्ही. ’
‘ तु बजावलेल्या कामगिरीचे योग्य बक्षिसच आहे ते. ’ मि. फॉग म्हणाले,
उरलेले सारे साखरेचे खडे धडपडेने हत्तीला भरवले व त्याचा प्रेमाने निरोप घेतला. हत्तीनेही आपल्या सोंडेने धडपडेला कुरवाळले.
औडाचे तिकीट धडपडेने काढून आणले व मडळी कलकत्याच्या गाडीत चढली.

## ८. जामिनावर सुटका

कलकत्त्याला गाडी पोचली तेव्हा सकाळचे सहा वाजले होते. हाँगकाँगची बोट बारा वाजता सुटणार होती. सर फ्रॅन्सिस, मि. फॉगना शुभेच्छा देऊन वाटेत बनारसला उतरून गेले.

स्टेशनाबाहेर पडतात तोच एका पोलिसाने मि. फॉगना हटकले,

' मि. फॉग तुमचं नाव ? हा तुमचा नोकर ? चला माझ्या-बरोबर चौकीवर. '

धडपडे भांडण काढणार होता. पण मि. फॉग नेहमीप्रमाणे अगदी शांत होते.

' चला, या बाईंना मात्र आमच्याबरोबर राहाण्याची परवा-नगी द्या.

पोलीस चौकीवर पोहोचल्यावर सगळ्यांना एका कोठडीत बंद करीत पोलीस म्हणाला,

' साडेआठ वाजता मॅजिस्ट्रेटसाहेब येतील. तेव्हा तुमचा खटला त्यांच्यापुढे उभा राहील. '

धडपडे गर्भगळित झाला.

' देवा रे ! आटपलंच आता सारं ! ' तो उद्गारला, ' बोट सुटून जाणार बारा वाजता. '

' त्यापूर्वी आपण सर्व बोटीवर दाखल झालेले असू. ' मि. फॉग शांतपणे म्हणाले.

साडेआठ वाजता खटला सुरू झाला. फिक्स डिटेक्टिव त्या तिन्ही संन्याशांना मुंबईहून घेऊन आला होता. त्यांनी धड-पडेला आरोपी म्हणून ओळखले व त्याच्याविरुद्ध साक्ष दिली. पुरावा म्हणून धडपडेचे बूट कोर्टापुढे सादर करण्यात आले. धडपडे एकदम ओरडला,

' ओ—माझे बूट—हेच माझे बूट.

याप्रमाणे धडपडे कबुलीजबाब देऊन मोकळे झाल्यावर मि. फॉग शांतपणे म्हणाले,

' गुन्हा कबूल. '

उगीच वाद घालून त्यांना आपला अमूल्य वेळ दवडावयाचा नव्हती.

' पवित्रस्थानातील प्रवेशाबाबतचा नियम मोडल्याबद्दल तिनशे

पौण्ड दंड व मारामारीबद्दल पंधरा दिवस कैद नोकराला. मालक नोकराच्या अपकृत्यांबद्दल जबाबदार धरला जातो, म्हणून मि. फॉग यांना १५० पौण्ड दंड व आठ दिवस कैद.'

धडपडे ऐकून रडायच्या बेताला आले. दंडाच्या जबर रकमेने तर तो हादरलाच. पण आता पैजेचे पैसे पाण्यात जाणार म्हणून ते कासावीस झाले. मालक इथे तुरुंगात आठ दिवस अडकल्यावर मग कसली पुरी होते पृथ्वीप्रदक्षिणा ऐंशी दिवसांत !

आणि हे सगळे आपल्या मूर्खपणामुळे झाले. कशाला आपण धडपडलो त्या देवळात बूट घालून आणि मग मारामारी तरी कशाला शेण खायला केली ?

पण मि. फॉगची शांती अजिबात ढळली नव्हती. ते मॅजिस्ट्रेटना म्हणाले—

' मी जामीन द्यायला तयार आहे. '

कायद्याने तुमची जामिनावर सुटका करता येते. तुम्ही इथे अगदीच परके— तेव्हा तुम्हाला—म्हणजे प्रत्येकी एकहजार पौण्ड जामीन द्यावा लागेल. शिक्षा भोगण्यासाठी आठ दिवसात तुम्ही परत आला नाहीत, तर तुमचे दोन हजार पौण्ड सरकारात जमा केले जातील.'

आपल्या बॅगेतून मि. फॉगनी दोन हजार पौण्ड जामिनाचे व दंडाचे चारशे पन्नास पौण्ड काढले व ते मॅजिस्ट्रेटपुढे ठेवून ते तावडतोब कोर्टाबाहेर पडले.

' अहो, माझे बूट तरी घेऊ द्या मला. त्यांची किंमत आता दोन हजार चारशे पन्नास पौण्ड झाली आहे. बाकी बेटे मला फार लागायचे ते. ' असे बडबडत धडपडे लगबगीने मि. फॉग व श्रीमती औडा यांच्या पाठोपाठ गेले.

तिघेही हाँगकाँगची बोट सुटायच्या आधी एक तास बोटीवर दाखल झाले होते.

फिक्सही हात चोळीत बोटीवर चढला होता. फॉगना कलकत्याला अडकवून ठेवण्याचा त्याचा बेत फसला होता. आता हाँगकाँगमध्ये ब्रिटिश हद्दीत मि. फॉगवर वॉरंट बजावयाचे,

असा नवा बेत करून ते हाँगकाँगला निघाले होते. कोर्टातुन बाहेर पडल्याबरोबर हाँगकाँगला मि. फॉगच्या नावाचे वॉरंट पाठविण्याबद्दल त्याने मुंबईस तार पाठवली होती.

या बोटीचे नाव होते एस्. एस्. रंगून. ही बोट मंगोलिआ-इतकी मोठी नव्हती. पण चांगली वेगवान होती. ती अकरा दिवसात हाँगकाँग गाठणार होती.

श्रीमती औडा आता मनाने व शरीराने चांगलीच सावरली होती. तिचा सुंदर चेहरा त्याच्यावरील प्रसन्नतेने फारच खुलून दिसे. आपल्या उपकारकर्त्याबद्दल तिला आदर व प्रेम वाटू लागले होते. पण ते मात्र तिच्याशी फारच कमी बोलत. नेहमी कसल्यातरी तंद्रीत असत. या त्यांच्या वृत्तीबद्दल तिला आश्चर्य वाटे. पण मग धडपडेकडून पैजेची सारी हकीगत तिला समजल्यावर मात्र तिचा त्यांच्याबद्दलचा आदर जास्तच वाढला. कारण पैज हरण्याचा धोका पत्करून मि. फॉगनी तिचे प्राण वाचवण्यासाठी आपला अमूल्य वेळ खर्च केला होता हे तिच्या लक्षात आले. मि. फॉगना पैज जिंकण्यात यश यावे म्हणून ती प्रार्थना करू लागली.

फिक्सचा धडपडेशी मैत्री वाढवून बातमी काढण्याचा उद्योग चालूच होता. धडपडेने त्याला श्रीमती औडाची हकीगत सांगितली. तेव्हा फिक्स जरा कोड्यातच पडला. चोरी करून पळ काढणारा हा दरोडेखोर या बाईला सोडविण्यासाठी वाटेत का थांबला व तिची ब्याद त्याने आपल्या गळ्यात का बांधून घेतली हे काही केल्या त्याच्या लक्षात येईना.

तीस ऑक्टोबरला दुपारी रंगून बोट मलाक्का सामुद्रधुनीतुन जाऊ लागली. यावेळेपर्यंत तिने बारा तासांचा वेळ वाचवला होता. दुसऱ्या दिवशी पहाटे चार वाजता ती सिंगापूरला पोहोचली.

आता हाँगकाँग दोन हजार मैल दूर होते. पाच नोव्हेंबरला मि. फॉगना हाँगकाँग येथे याकोहामाला जाणारी बोट पकडायची होती.

पण सिंगापूरनंतर ' रंगूनचा ' वेग मंदावू लागला. सिंगापूरला जादा उतारू बोटीवर चढले होते. शिवाय समुद्रही आता खवळला होता. धडपडेचा जीव धडपडू लागला. वेग कमी केल्याबद्दल तो खलाशांना व बोट कंपनीला मनातल्या मनात लाखो शिव्या घालीत होता. श्रीमती औडाही उशीरा पोहोचण्याच्या भीतीने अस्वस्थ झाली होती.

वादळामुळे वेग कमी होऊन बोटीला जसजसा उशीर होऊ लागला तसतसा फिक्सला मात्र जास्त जास्त आनंद होत होता. मुंबईहून हाँगकाँगला येऊ घातलेल्या वॉरंटला तितकीच जास्त सवड मिळणार होती ना!

सहा नोव्हेंबरला सकाळी बोट हाँगकाँगच्या बंदरात शिरली. याकोहामाची बोट पाच नोव्हेंबरला संध्याकाळीच सुटणार होती. अगदी दुर्मुखल्या मुद्रेने धडपडे खाली उतरला.

पण मि. फॉग मात्र अगदी शांत होते.

' याकोहामाला जाणारी पुढली बोट केव्हा सुटेल?' त्यांनी चौकशी केली.

' उद्या सकाळी भरतीबरोबर ' उत्तर मिळाले.

पण मि. फॉगच्या चेहऱ्यावर आनंदाचे किंवा आश्चर्याचे काहीच चिन्ह उमटले नाही.

' उद्या सुटणाऱ्या बोटीचं नाव काय ? '

' कर्नाटक. '

' पण ही ' कर्नाटक ' काल सुटणार होती ना ?'

' सुटणार होती. पण एंजिनात बिघाड झाला—तो दुरुस्त करण्यात वेळ मोडला. '

धडपडे ही शुभवार्ता ऐकून आनंदाने अगदी उलथापालथा झाला. देवाच्या कृपेने दुरुस्तीसाठी ' कर्नाटक ' थांबली नसती तर—पुढची बोट आठ दिवसांनी सुटणार होती !

मि. फॉगच्या वेळापत्रकाप्रमाणे प्रवासात त्यांची चोवीस तासांची खोटी झाली होती. पण फॉग शांत होते. पुढच्या प्रवासात कुठेतरी ही कसर भरून निघेल याची त्यांना खात्री होती.

हाँगकाँगला उतरल्यावर पहिली गोष्ट करायला हवी होती. श्रीमती औडाला तिच्या चुलतभावाकडे पोचवण्याची. चौकशी केल्यानंतर असे समजले की, श्रीमती औडाचा भाऊ आपला हाँगकाँगचा व्यापार आटोपता घेऊन युरोपला निघून गेला होता. बिचारी औडा. मि. फॉगचा सहवास अंतरणार म्हणून आधीच ती खिन्न झाली होती आणि आता ही बातमी आली. या परक्या देशात आता काय करणार ती ?

मि. फॉग अगदी सहज बोलावे तसे म्हणाले—

' तुम्ही पण चला ना आमच्याबरोबर. लंडनला पोचल्यावर मग काढू तुमच्या भावाचा शोध युरोपमध्ये. '

' भलतंच ! ' औडा अगदी संकोचून म्हणाली, ' कुणाची कोण मी ! माझ्यासाठी तुम्ही इतका खर्च करणार व इतकी तसदी घेणार ?'

' धडपडे, ' मि. फॉग म्हणाले, ' कर्नाटक बोटीवर याकोहामासाठी तुम्ही तीन केबिन रिझर्व करा. '

त्यावेळी कुणाच्या तरी मनात असे आले असते का, की या तीनपैकी दोन केबिन याकोहामाला रिकाम्याच जाणार आहेत म्हणून ?

●

## ९. अफूच्या तारेत

तिकिटे काढून झाल्यावर धडपडे नेहमीच्या पद्धतीप्रमाणे शहरात भटकायला निघाला. फिक्सने त्याला बाजारात गाठले व त्याला एका उपाहारगृहात नेले.

बोलता बोलता फिक्सने धडपडेपाशी आपले गुपित सांगून टाकले. ' काय ? तुम्ही पोलिसात आहात ?' धडपडे आश्चर्याने म्हणाला, ' मला आपले वाटत होते की मालकांच्या त्या क्लबातल्या पैज लावणाऱ्या मित्रांनी तुम्हाला आमच्या पाळतीवर पाठवले असावे—आम्ही खरंच पृथ्वीप्रदक्षिणा करतो की नाही हे पाहायला. '

'छे! सी. आय. डी. तला डिटेक्टिव्ह आहे मी. बँकेवर दरोडा घातल्याच्या आरोपाबद्दल मि. फॉगना पकडण्याची कामगिरी माझ्याकडे सोपवण्यात आली आहे. पण लंडनहून त्यांच्या नावाचं वॉरंट अजून आलं नाही. हे बघा धडपडे, जरा मदत करा की मला. काही तरी करून वॉरंट येईपर्यंत त्यांना इथे अडकवून ठेवलंच पाहिजे मला. एकदा हाँगकाँग सुटलं की लंडनपर्यंत कुठं ब्रिटिश मुलुख नाही! ही एवढी मोठी पायपीट करायचं जिवावर आलंय माझ्या. मला मदत कराल तर फॉगना पकडण्याबद्दल जे चार हजार पौण्डाचं बक्षीस खात्यानं जाहीर केलं आहे त्यातलं अर्धं तुम्हाला मिळवून देईन मी.'

धडपडे ही सगळी बडबड ऐकून भलताच चिडला. 'साफ खोटं!' तो भडकून म्हणाला, 'आमचे मालक असलं दरोडा घालण्याचं अपकृत्य कधीही करणार नाहीत आणि समजा तुमच्या म्हणण्याप्रमाणे जरी त्यांनी ते केलं असलं तरी मी त्यांना पकडून देण्यास तुम्हाला कालत्रयी मदत करणार नाही. असा विश्वासघात या धडपड्याच्या हातून होणार नाही. मला ते एखाद्या राजासारखे फर्स्टक्लासमधून, केबिनमधून, हत्तीवरून आपल्या बरोबरीने हिंडवताहेत! माझ्या मुंबईतल्या मूर्खपणाने केवढे संकट आले त्यांच्यावर व केवढा प्रचंड भुर्दंड सोसावा लागला—पण एका शब्दाने ते रागावले नाहीत मला. आणि अशा थोर, उदार मालकाशी फितूर व्हायला सांगता तुम्ही मला?'

संतापाने धडपडेच्या तोंडाला फेस येण्याची वेळ आली.

आता फिक्सने पवित्रा बदलला. सामदाम फुकट गेल्यावर त्यांनी एक नवीनच क्लुप्ती आपल्या पोतडीतून काढली.

ते मवाळपणे म्हणाले—

मिस्टर, गरम कशाला होता एवढे? नसली मला मदत करायची तर नका करू बापडे. पण तुमच्यापुढच्या खाद्यपेयांचा तर समाचार घ्याल?

बोलताबोलता शेजारच्या टेबलावरची चिलीम उचलून त्यांनी ती धडपडेपुढे केली.
' आणि हिचेही घ्या दोन झुरके. मन शांत व आनंदी ठेवण्याचा चीनचा खास इल्म आहे हा. '
' असं म्हणता ? ' धडपडे चिनी चहाचे घुटके घेत व चिनी भाताशी चिनी काड्यांनी लपंडाव खेळत म्हणाले.
आता त्यांचा राग जरा निवळला होता व ' मजा मारण्याची ' लहर त्यांच्यावर स्वार झाली होती.
' कुठलीही गोष्ट एकदा करून पाहावयास तयार असतो आपण नेहमी. '
तो म्हणाला व त्याने गंमतीने चिलीम उचलली व भराभर चार झुरके घेतले.
चिलीम भलतीच कडक होती. धडपडेचे डोके गरगरू लागले. बेभान होऊन त्याने समोरच्या टेबलावर डोके टेकले. फिक्सचा हर्ष गगनात मावेना. धडपडेवरचा अफूचा अंमल तीनचार तास तरी उतरणार नव्हता.
आणि ' कर्नाटक 'च्या इंजिनाची दुरुस्ती लवकर झाल्यामुळे त्या संध्याकाळीच ती सुटणार होती.
ही बातमी दोघांनाही बाजारातून फिरताना समजली होती. चिनी खाना खाऊन झाल्याबरोबर धडपडे ही बातमी आपल्या मालकाला देण्यासाठी तातडीने जाणार होता
पण आता--
फिक्स मिशीतल्या मिशीत हसत होता.
' भली झाली ! ' ते मनाशी म्हणाले, ' फॉग अजून याच भ्रमात आहेत की ' कर्नाटक ' उद्या सुटणार ! ही स्वारी अडकली इथेच--आता दुसरी बोट आठ दिवस नाही--तोवर वॉरंट नक्कीच येऊन थडकणार ! '
इकडे मि. फॉग औडाचे मन रमविण्यासाठी तिला बाजारात हिंडवित होते व नानातऱ्हेच्या चिनी चिजा तिला आग्रहाने खरेदी करायला लावित होते. संध्याकाळी ते आपल्या हॉटे-

परतले. उत्कृष्ट चिनी खाना घेऊन दोघे आपापल्या खोल्यात झोपायला निघून गेले. दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठून 'कर्नाटक' पकडायची होती ना!

धडपडे अजून हॉटेलात परतला नव्हता, पण तो नेहमीप्रमाणे बोटीच्या वेळेवर हजर होईल अशी खात्री होती त्यांची.

पण सकाळी तांबडे फुटले, मि. फॉग व श्रीमती औडा तयार झाली होती तरी धडपडेचा पत्ता नव्हता.

तो परस्पर बोटीवर गेला असेल अशी कल्पना करून दोघे बंदरावर आली–

पण तेथे त्यांना धडपडे तर दिसला नाहीच पण 'कर्नाटक' ही दिसली नाही.

धक्क्यावरच्या माणसाकडून त्यांना समजले की, 'कर्नाटक' आदल्या दिवशी संध्याकाळीच हाँगकाँग सोडून याकोहामाच्या मार्गाला लागली होती.

औडाचे तोंड फार उतरून गेले. याकोहामाला जाणारी दुसरी बोट आठ दिवस सुटणार नाही हे समजल्यावर तर तिच्या डोळ्यांतून पाणी वाहू लागले.

आता कसली ऐंशी दिवसांत पृथ्वीप्रदक्षिणा होते!

पण मि. फॉग काडीमात्र डगमगले नव्हते.

ते बंदरात नांगरून पडलेल्या गलबतांचे निरीक्षण करू लागले.

एका वीस टनी, चार खलाशांच्या, मार्गदर्शक (पायलट) बोटीच्या कप्तानाकडे ते गेले. जास्त शब्द खर्चण्याचा मि. फॉगचा स्वभावच नव्हता. ते एकदम म्हणाले,

'याकोहामाला नेणार का बोट?

'काय विचारता साहेब! एवढ्याशा बोटीचा सोळाशे मैलांच्या लंब्या सफरीत निभाव लागेल काय!'

'मला १४ तारखेपर्यंत याकोहामाला पोचलेच पाहिजे. तुम्हाला बोटीचे भाडे दर दिवसाला नऊ पौण्ड देईन. वेळेवर पोचवलंत तर दोनशे पौण्ड बक्षीस.'

भाड्याचे व बक्षिशीचे आकडे ऐकून कप्तान सर्दच झाला.

' चेष्टा तर नाही करीत, साहेब, तुम्ही ? '

' मला चेष्टा करायची सवय नाही. '

साहेब, मी तुम्हाला शांघायपर्यंत नेईन. '

' पण याकोहामाला मला अमेरिकेस जाणारी बोट गाठलीच पाहिजे. '

' ती बोट तुम्हाला शांघायलाही मिळू शकेल. तिथून पुढे ती याकोहामाला जाते व नंतर अमेरिकेच्या मार्गाला लागते. '

' नक्कीच सापडेल बोट शांघायला ? '

' नक्कीच. अकरा तारखेला संध्याकाळी अमेरिकेची बोट शांघायला लागते. म्हणजे अजून चार दिवस वेळ आहे चीनच्या किनाऱ्या किनाऱ्याने माझी छोटीशी बोट चालवीत शांघायपर्यंतचे आठशे मैलांचे अंतर मी नक्कीच ९६ तासांत तोडू शकेल. '

' चला तर मग; निघू तावडतोब.

## १०. विघ्नांवर विघ्ने

या बोटीचे नाव होते 'तखदीर' दिसण्यात मोठी देखणी; वाटेल तशा भयंकर वादळात सुद्धा ती इतर बोटींना मार्गदर्शन करी. अनेक शर्यतीत तिने बक्षिसे पटकावली होती.

पण तरी सुद्धा नोव्हेंबर महिन्यात आठशे मैलांचा प्रवास धोक्याचाच होता. चीनजवळचा समुद्र या मोसमात नेहमीच खवळलेला असे व त्यावर सारखी वादळे होत. पण आग्नेय दिशेचा वारा अनुकूल असल्यामुळे 'तखदीर' भराभर अंतर कापीत होती.

फिक्सच्या विनंतीवरून मि. फॉगने, धडपडेचा दोस्त म्हणून त्याला बोटीवर घेतले होते.

यावेळीही फिक्सची तीव्र निराशा झाली होती. बोट चुकल्यामुळे मि. फॉग हाँगकाँगमध्ये अडकून पडतील हा त्याचा अंदाज मि. फॉगच्या धाडशी हिकमतीने धुळीस मिळाला होता.

वॉरंट लिव्हरपूलला पाठविण्याबद्दल ठिकठिकाणी ; तारा करून ती 'तखदीर' वर चढला होता. काही झाले तरी मि. फॉगची पाठ त्याला सोडायची नव्हती.

पण धडपडे कुठे होता ?

मि. फॉगच्या तोंडावर त्याबद्दलचीही फारशी काळजी दिसत नव्हती. त्यांनी तर्क केला होता की धडपडेला 'कर्नाटक' संध्याकाळी सुटणार ही बातमी लागली असावी; पण आपल्याला ती कळवायला कुठे तरी अडचणीत सापडल्यामुळे त्याला सवड झाली नसावी, व मग शेवटच्या घटकेला तो 'कर्नाटक' मध्ये जाऊन अडकला असावा.

मुंबईच्या घटनेमुळे अडचणीत सापडण्याचे धडपडेचे कसब मि. फॉगना ठाऊक होतेच. याकोहामाला तो आपली वाट बघत थांबेल अशी मनाशी गाठ गाठ बांधून मि. फॉग स्वस्थ होते.

दुसऱ्या दिवशी समुद्रावर वादळ होण्याची चिन्हे दिसू लागली. पण त्याबद्दल मि. फॉगना चिंता वाटली नाही. वादळ दक्षिणेकडून येत होते तेव्हा त्यायोगे 'तखदीर' उलट जास्तच जोराने पुढे ढकलली जाणार होती.

वादळापासून बोटीचा बचाव करण्याची खलाशाची तयारी केली. त्यांनी शिडे उतरून घेतली व आत पाणी शिरू नये म्हणून साऱ्या झडपा बंद करून टाकल्या.

थोड्याच क्षणात सोसाट्याचे वादळ व धुवांधार पाऊस त्या नाजूक बोटीला झोडपू लागले. एखाद्या पिसासारखी बोट समुद्राच्या पृष्ठभागापासून वर उचलली जाऊ लागली. कधी कधी समुद्राच्या पर्वतप्राय लाटा तिचा घास घेणार असे वाटे. पण तिच्या कुशल कप्तानाने सुकाणूवर पक्का ताबा ठेवून तिला साऱ्या संकटातून बचावले होते.

फिक्स घाबरून गेला होता. मि. फॉगचा पाठलाग आता स्वर्गापर्यंत करायची वेळ येते की, काय या भीतीने त्याचे हातपाय गळाठले होते.

मि. फॉग मात्र एखाद्या दीपस्तंभाप्रमाणे ताठ, अचल होते. वादळाने भ्यालेल्या औडाला त्यांचे धैर्य पाहून धीर येत होता व त्यांच्याबद्दलचा तिचा आदर व जिव्हाळा क्षणीक्षणी वाढत होता.

पण वादळाचा जोर वाढतच राहिला. शेवटी कप्तान मि. फॉगकडे गेला व म्हणाला,

‘ मला वाटतं आता आपण एखाद्या बंदराचा निवारा शोधला पाहिजे ’

‘ हो, मला पण असंच वाटतं ’ मि. फॉग शांतपणे म्हणाले. आपल्या जवळचा नकाशा मि. फॉग पुढे करीत कप्तान म्हणाला,

‘ कुठल्या बंदराचा घ्यावा आसरा ? ’

मि. फॉग नकाशा गुंडाळीत म्हणाले.

‘ अर्थात् शांघायचा. ’

मि. फॉग यांचा करारीपणा, निर्भयता व धाडशीपणा पाहून सागरी सफरीत मुरलेल्या त्या कप्तानाचीही मान आदरानं लवली. तो निमूटपणे सुकाणूवर जाऊन ते शांघायच्या दिशेने फिरवू लागला.

हळूहळू वादळाचा जोर कमी होऊ लागला. अकरा नोव्हेंबरला उजाडता कप्तानाने फॉगना कळविले की, शांघाय आता शंभर मैलांवर आले होते. वादळाने त्यांचा असा छळ केला नसता तर त्यांनी आणखी सत्तर मैलांची मजल एव्हांना नक्कीच मारली असती.

पण अजूनही काही विशेष बिघडले नव्हते. ‘ अमेरिकेची बोट शांघायहून सुटण्याच्या आधी तखदीर ’ बंदरात शिरण्याची अजूनही खात्री होती.

पण नशीबाने आज सर्वांचे सत्त्वच बघण्याचे ठरविले होते जणू. आता वारा पार पडला. ‘ तखदीर ’ची गती मंदावली. सध्याकाळचे सात वाजले तरी ती अजून शांघायपासून तीन मैलांच्या अंतरावर होती

वेळेवर न पोचल्यामुळे दोनशे पौण्डाचे घवघवीत बक्षीस हातातून निसटणार म्हणून कप्तानाचा चेहेरा काळवंडला.

पण वीस हजार पौण्ड हातातून निसटण्याचे चिन्ह दिसत असूनही आमचे बहादर मि. फॉग किंचितही विचलित झाले नाहीत.

डेकच्या पुढच्या बाजूला शांघाय बंदरावर नजर रोखून ते उभे होते. . .

त्यांच्या तीक्ष्ण नजरेला बंदरातून निघणारा धुराचा लोट दिसला. धुराचा लोट याकोहामाच्या दिशेने जात होता.

हीच ती शांघायहून नुकतीच निघालेली, याकोहामा वाटेत घेऊन नंतर अमेरिकेला जाणारी बोट.

तावडतोब कप्तानाकडे वळून ते म्हणाले–

' बोट संकटात असल्याच्या तुमच्या नेहमीच्या खुणा तावडतोब दाखवा. निशाण डोलकाठीच्या अर्ध्यावर उतरवा. बोटीवरील तोफेचा खुणेचा बार काढा. '

' ठोऽऽ '–असा गगनभेदी आवाज अमेरिकन बोटीवर ऐकू गेला. तिच्या कप्तानाने तखदीर 'च्या दिशेने दुर्बीण रोखली. खलाशांची धावपळ सुरू झाली.

थोड्यात वेळात मि. फॉग, श्रीमती औडा व फिक्स त्या अमेरिकन बोटीवर चढले.

आपली बक्षिसी घेऊन 'तखदीर 'चा कप्तान, मि. फॉगला शुभेच्छा देऊन खुषीत परत फिरला.

या अमेरिकन बोटीचे नाव होते ' जनरल ग्रँट ' मोठी मजबूत व वेगवान बोट होती ती. शिडांच्या जोडीला, वेग येण्यासाठी तिच्यावर वाफेची एंजिनेही बसविलेली होती. याकोहामापासून सॅन् फ्रॅन्सिस्कोपर्यंत चार हजार मैलांचे अंतर ती एकवीस दिवसांत सहज तोडीत असे.

मि. फॉग मनाशी हिशेब करीत होते. तीन डिसेंबरला बोट सॅन् फ्रॅन्सिस्कोला पोचेल. मग आगगाडीने न्यूयॉर्क ११ डिसेंबर. नंतर बोटीने व आगगाडीने लंडन वीस डिसेंबर.

२१ डिसेंबरला संध्याकाळी ८-४५ वाजता क्लबमध्ये हजर राहून पैज जिंकणे अगदी सहज शक्य होणार होते आता.

## ११. धडपडे सापडले

जनरल ग्रँट याकोहामाला पोचल्यावर धडपडेची गाठ पडेल, असा मि. फॉगचा तर्क होता. तो कितपत खरा ठरला हे आता पाहू या.

धडपडे हाँगकाँगला उपाहारगृहात टेबलावर डोके टेकून बराच वेळ पडले होते. पण त्यांच्या 'आतल्या आवाजाने' संध्याकाळच्या सुमारास त्यांना भानावर आणले असावे.

ते शुद्धीवर आले व ताडकन उठून उभे राहिले. प्रथम आपण कुठे आहो, पुढे कुठे जायचे आहे काहीच त्यांच्या लक्षात येईना.

पण हळूहळू त्यांच्यावरील अफूचा अंमल कमी झाला. विजेचा धक्का बसल्यासारखे ते एकदम धावतच उपाहारगृहाच्या बाहेर आले.

'कर्नाटक, कर्नाटक' ते स्वतःशी पुटपुटू लागले.

हो ! ती संध्याकाळी-म्हणजे आताच सुटणार आहे. अंधार पडू लागला होता.

मालकाला 'कर्नाटक'च्या बदललेल्या वेळाची सूचना द्यावयाला त्यांच्या हॉटेलकडे जायला हवे होते.

पण वेळ आहे का तेवढा ?

कुठले बरे हॉटेल–कुठल्या बाजूला आहे ते–

धडपडेच्या डोक्यात गोंधळ उडाला होता.

उशीर होत होता–

शेवटी काही झाले तरी बोट चुकता कामा नये, असा निर्णय घेऊन धडपडे बंदराकडे धावत सुटले–

'कर्नाटक'सुटायच्या बेतात होती.

धडपडत धडपडे आपल्या केबिनमध्ये जाऊन आपल्या बर्थवर

कोसळले.

दुसऱ्या दिवशी सकाळी डोळे चोळीत ते मालकाला शोधीत साऱ्या बोटभर हिंडून आले. पण मि फॉग व श्रीमती औडा यांच्या केबिन रिकाम्याच पडलेल्या त्यांना आढळल्या असं. मालकांना 'कर्नाटकाची' बदललेली वेळ समजलीच नसावी. अरे, अरे! काय झाले हे! पुन्हा आपला मूर्खपणा मालकांना नडणार त्या हलकट फिक्सने हातात दिलेली चिलीम--

कुठल्याही शहाण्या माणसाने तीत काहीतरी काळेबेरे आहे असे ओळखले असते तावडतोब--

आपल्यासारखे गाढव आपणच.

तिकिटाचे पैसे भरलेले असल्यामुळे धडपडेला बोटीवर राहण्याची, खाण्यापिण्याची काही पंचाईत पडली नाही. पण बोटीवरचे दिवस मात्र फार दुःखात जात होते.

'कर्नाटक' बोट तेरा नोव्हेंबरला याकोहामाला पोहोचली. धडपडे खाली उतरले.

या परक्या जपानी मुलखात ते अगदी एकटे होते. ना जवळ पैसा ना कुणाची ओळखदेख.

आज शहरात भटकताना त्यांना नेहमी सारखी नवनवे चेहरे चित्रविचित्र पोशाख, प्रेक्षणीय इमारती, झगझगीत बाजार यांची गंमत वाटत नव्हती.

भटकता भटकता त्यांच्या पोटात कावळे ओरडू लागले. पण जवळ पैसे कुठे होते?

शेवटी एका जुन्या कापडांच्या दुकानात जाऊन त्यांनी आपल्या इंग्लिश कपड्यांच्या बदल्यात स्वस्त जपानी कपडे घेतले. ते कपडे घालून व उरलेल्या पैशात एका उपाहारगृहात खाऊन घेऊन ते पुन्हा भटकू लागले.

आता पुढे काय करायचे?

आपले चांदीचे घड्याळ विकून पैसे उभे करण्याची कल्पनाही त्यांना सहन होत नव्हती.

शेवटी त्यांनी मनाशी एक बेत ठरविला.

अमेरिकेला जाणाऱ्या एखाद्या बोटीवर मिळेल ती नोकरी धरायची. इथे नाही पण सॅनफ्रॅन्सिस्कोला मालक नक्की भेटतील.

पुन्हा बंदराकडे परतताना वाटेत त्यांना एक घोडागाडी भेटली. गाडीपुढे बँड वाजत होता. गाडीवर भली मोठी जाहिरात झळकत होती. एका बाजूच्या फलकावरची अक्षरे त्यांना वाचता येईनात. बहुतेक जपानी लिपीत असावीत ती. पण दुसऱ्या बाजुच्या फलकावर इंग्लिशमध्ये लिहिले होते—

' सर्कस—जगातली सर्वांत मोठी सर्कस. '

' लांबनाक्यांची अद्भूत बांबू कसरत. '

' शेवटचा खेळ—त्वरा करा—शेवटचा खेळ—'

' उद्या सकाळी सर्कस अमेरिकेला रवाना होणार. '

धडपडेला वाटले, सर्कशीच्या रूपाने देवच भेटला आपल्याला. धडपडेने लहानपणी खूप व्यायाम, कसरत केली होती तिच्या जोरावर या सर्कशीत नोकरी मिळाली तर काय बहार होईल! पण या जपानी लोकांच्या सर्कशीत आपल्याला घेतील ?

पत्ता काढीत काढीत जिथे सर्कस उतरली होती, तिथे धडपडे गेला व त्याने व्यवस्थापकांची भेट घेतली. व्यवस्थापक म्हणाला—

' आमचा एक लांबनाक्या आजच आजारी झाल्यामुळे आजच्या खास खेळाचे—लांबनाक्याच्या बांबू कसरतीचे काय होईल याची काळजीच वाटत होती मला. तुला असल्या कसरतीचा अनुभव आहे म्हणतोस ? जपानी माणसाच्या अंगी हे कसब जन्मजातच असते म्हणा. '

पण मग एकदम चमकून ते म्हणाले—

' अरे पण तु काही जपानी नाहीस. तुझ्या कपड्यांनी फसलो मी. '

पण धडपडेने व्यवस्थापकाला कळवळून सांगितले की, जपानी नसलो तरी त्याला कसरतींचे चांगले ज्ञान आहे. चार दोन

कसरती उडयाही धडपडेने मारून दाखविल्या.

शेवटी व्यवस्थापक म्हणाला,

'आजच्या दिवस तुला ठेवून घेतो मी. तुझं आजचं काम पाहून मग तुला नोकरी द्यायची की नाही ते ठरवू'

धडपडेने विदुषकाचे कपडे चढविले. लांबनाक्या बनविण्यासाठी त्यांच्या नाकावर एक सहा फूट लांब बांबू बसाविण्यात आला. त्यांच्या दोन्ही खांद्यावर रंगारंगाचे पंख चिकटविण्यात आले.

खेळाची वेळ झाली. बँड वाजू लागला. सर्कशीचा तंबू प्रेक्षकांनी गजबजुन गेला होता. पहिले नाना प्रकारचे कसरतीचे खेळ संपल्यावर शेवटचा कार्यक्रम— त्या दिवशीचे खास आकर्षण— सुरू झाला.

बारा लांबनाके—भडक रंगाचा विदुषकी पोशाख केलेले, खांद्याला रंगीबेरंगी पंख चिकटविलेले व नाकावर बांबू बसाविलेले जमिनीवर उताणे पडले. त्यांच्या नाकांवरच्या बांबूवर बारा मल्ल तोल संभाळीत नाना प्रकारच्या कसरती करू लागले सारे लोक श्वास रोखून त्यांचे कौशल्य पाहात होते. शेवटी तर या सगळ्या लांबनाक्यांनी तोल संभाळीत, एकावर एक तीन मजली पिरॅमिड केला. तेव्हा टाळ्यांच्या कडकडाटाने सगळा तंबू दणाणून गेला.

पण—पण हे काय! हा सगळा पिरॅमिड एकदम कोसळला कसा? असा अपघात या 'लांबनाक्यांच्या अद्भूत कसरतीत' पूर्वी कधीच झाला नव्हता.

अपघाताचे कारण—

जमिनीवर पडलेल्यांपैकी एक लांबनाक्या प्रेक्षकांच्या गॅलरीकडे, एकदम उठून, धावत सुटला होता.

रिंगमास्टर शिव्या देत त्याच्यामागे लागला.

हो, आमचा धडपडेच होता तो.

उताणा पडल्या पडल्या त्याला वाकडे डोळे करून प्रेक्षकांकडे पाहाता येत होते.

पाहता पाहता त्याला कोण दिसले ?

याकोहामाला पोचलेले मि. फॉग व श्रीमती औडा मन रमविण्यासाठी ती प्रसिद्ध जपानी सर्कस पाहायला आले होते.

' मालक, मालक ' हातवारे करीत धडपडे ओरडला.

' कोण, धडपडे ? तूच का आहेस ?'

' हो, हो, मीच तो, बाईसाहेब–'

' चल लौकर बोटीकडे. ' मि. फॉग म्हणाले.

तिघे बाहेर पडू लागले. पंखे किंवा बांबू काढण्यासाठी सुद्धा मालकापासून दूर व्हायला धडपडे तयार नव्हता.

सर्कशीचा व्यवस्थापक चिडून धडपडेचा दंड धरू लागला. पण मि. फॉगनी नोटा कोंबून त्याची मूठ बंद केली.

तशाच अवतारात धडपडे, मि. फॉग व श्रीमती औडासह ' जनरल ग्रँट'वर चढले.

साडेसहा वाजता जनरल ग्रँट पॅसिफिक महासागरातून मार्ग काढू लागली.

मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रा. क्र.
ठाणे

## १२. बोटीतून आगगाडीत

प्रवास मोठ्या खुषीत व आरामात चालला होता.पॅसिफिक महासागर नावाप्रमाणेच अगदी शांत होता.

धडपडेचा जीव आता बराच खाली पडला होता. हिंदुस्थान, चीन, जपान अशा अनोळख्या मुलखातून ते आता परिचित प्रदेशात,आपल्या वाटणाऱ्या तोंडवळ्यांच्या लोकात जाणार होते. नऊ दिवसांचा बोटीतील प्रवास झाल्यावर मि. फॉगची अर्धी पृथ्वीप्रदक्षिणा पुरी झाली होती. २३ नोव्हेंबरला १८०° ची रेखांशाची रेषा बोटीने ओलांडली. पृथ्वीच्या शून्य रेखांशावर असलेल्या ग्रीनिचच्या बरोबर उलट्या बाजूला ही १८०° ची रेखांशाची रेषा येते. हिला तारखेची रेषा–Date Line असे म्हणतात.

ऐंशी दिवसातले बावन्न दिवस यावेळेपर्यंत खर्ची पडले होते.

अर्धी पृथ्वीप्रदक्षिणा झाली असली तरी अंतर मात्र दोनतृतीयांश काटले गेले होते. कारण मि. फॉगनी आतापर्यंत काही सरळ रेषेत प्रवास केला नव्हता. ते लंडनहून खाली दक्षिणेला एडनला आले होते. एडनहून जवळ जवळ सरळ रेषेत मुंबईमार्गे कलकत्याला गेले होते. तिथून पुढे दक्षिणेला सिंगापूरला येऊन पुन्हा उत्तरेला हाँगकाँगला गेले होते. आणखी उत्तरेला याकोहामाला जाऊन ते अमेरिकेच्या बोटीत बसले होते. आता नंतरचा प्रवास मात्र अमेरिकेतून व अ‍ॅटलांटिक महासागरातून सरळ रेषेत होणार होता. त्यामुळे उरलेली प्रदक्षिणा सत्तावीस दिवसांतच होणार होती.

लंडन ५०° अक्षांशावर आहे, त्याच अक्षांशावरून सरळ प्रवास करीत ते याकोहामाला गेले असते तर त्यांचा प्रवास थोड्या दिवसांत झाला असता. पण तसे सरळ जायला प्रवासाची साधने कुठे उपलब्ध होती ? मि. फॉगना तर वाटेत मिळेल ते वाहन पकडून प्रवास करावा लागला होता.

तेवीस नोव्हेंबरला घडपडेला आनंद व्हावा अशी एक गोष्ट घडली. त्या दिवशी त्याचे घड्याळ इतरांच्या घड्याळाबरोबर आले. इतके दिवस तुझे घड्याळ मागे आहे, असे कुणी म्हटले की तो चिडत असे. आपले ते सुंदर, मोठे, चांदीचे घड्याळ बिनचूक वेळ दाखवण्यात कुचराई करील ही कल्पनाही त्याला सहन होत नसे. आपल्या घड्याळातीलच वेळ बरोबर आहे असे तो म्हणे व घड्याळ पुढे करण्याच्या भानगडीत कधीच पडत नसे.

पण आज ते घड्याळ इतरांच्या घड्याळातील वेळच दाखवित होते. अर्थात् ही वेळ बरोबर बारा तास मागची होती. पण घड्याळात काही सकाळचे आठ, रात्रीचे आठ असा फरक नसतो.

ही गोष्ट घडपडेला कितीही समजावून सांगितली असती तरी त्याला ती समजली नसती व पटलीही नसती.

पण तुम्हाला ती समजेल व पटेलही. बहुतेक ती आधीच

तुमच्या ध्यानात आली असेल.

दरेक रेखांशाला, पूर्वेकडे प्रवास केला असता, कालमानात चार मिनिटांचा फरक पडतो हे पूर्वी आपण एकदा पाहिलेच. धडपडे आता १८०° रेखांशापर्यंत आले होते; तेव्हा दर रेखांशाला चार मिनिटांप्रमाणे ७२० मिनिटांचा म्हणजे बरोबर बारा तासांचा कालमानात फरक पडला होता. बारा तास धडपडेचे घड्याळ मागे होते, पण अर्थात् इतरांच्या घड्याळात दुपारचे बारा वाजले होते तेव्हा त्यांच्या घड्याळात आदल्या दिवशीच्या रात्रीचे १२ वाजले होते. पण घड्याळात नुसते बाराच दिसणार नाहीत का ?

धडपडे खूष होऊन स्वतःशी म्हणाले,

' उगीचच सगळेजण माझ्यापाशी रेखांश, पूर्वेकडे प्रवास, सूर्याची गती अशी डोकेफोड करीत होते. पण माझं घड्याळ बरोबर चालतं हे मला कधीपासूनच माहीत आहे.'

फिक्स पण या बोटीवर होतेच. धडपडेची नजर चुकविण्यासाठी ते आपल्या केबिनमध्ये लपून-छपून राहात. याकोहामाला कॉन्सलच्या कचेरीत त्यांना लंडनहून मुंबई, कलकत्ता, हाँगकाँग असा प्रवास करीत आलेले मि. फॉगच्या नावाचे वॉरंट अखेरीस एकदाचे मिळाले होते. पण त्याचा उपयोग फक्त ब्रिटिश मुलखातच होणार होता. तेव्हा चिकाटीने मि. फॉगचा पिच्छा न सोडता ते त्यांच्याबरोबरच इंग्लंडपर्यंत जाणार होते. मि. फॉगनी 'तखदीर' वरून त्यांना शांघायपर्यंत फुकट आणले होते. त्यामुळे त्यांचेच उपकार घेऊन आपण त्यांना पकडण्यासाठी त्यांचा पाठलाग करतो आहोत, या वस्तुस्थितीच्या जाणीवेने फिक्स मनातून ओशाळले होते. पण कर्तव्याची त्यांची जाणीव फार प्रखर होती. कर्तव्य बजाविण्यासाठी– वाटेल ते सोसण्याची, करण्याची त्यांची तयारी होती.

पण कितीही तोंड चुकविले तरी शेवटी एक दिवस धडपडेने त्यांना गाठलेच–

आणि चिडून चांगलेच बुकलून काढले–

याच्याच हलकटपणामुळे आपण अफूच्या तारेत मालकांची बोट चुकायला कारणीभूत झालो होतो–

आपले मालक हरहुन्नरी म्हणून त्यांनी दुसरी बोट मिळविली– पण या हरामखोरामुळे वीस हजार पौण्डांची पैज गमवायची वेळ आली होती ना !

फिक्स मुकाट्याने मार खात होते–बोलायला त्यांना तोंड कुठे होते !

पण धडपडेचा राग जरा ओसरल्यावर, कपडे झटकीत, उठून ते म्हणाले,

'हे पहा धडपडे, माझं ऐकता का जरा. फॉगला हाँगकाँगला अडकवून ठेवण्यासाठी मी तुम्हाला अफूची चिलीम दिली खरी–त्याबद्दल तुमचा मार मी मुकाट्यानं खाल्ला. आता फिटंफाट झाली. आता यापुढे–'

'आता यापुढे आमच्या मालकांच्या किंवा माझ्या वाटेला जाल– तर हाडं मोडूनच टाकीन तुमची.' कुस्तीचा पवित्रा घेत त्वेषाने धडपडे म्हणाले.

'तेच सांगतो आहे तुम्हाला. आता परिस्थिती पालटली आहे. आता तुमच्या मालकांइतकाच मी इंग्लंडला जायला उत्सुक आहे. मध्येच प्रवासात काही अडचण आली तर ती दूर करायला मी त्यांना मदतच करीन.'

त्याच्या शब्दावर त्या वेळेपुरता धडपडेने विश्वास ठेवला. मात्र त्याच्या हालचालींवर सक्त नजर ठेवण्याचा त्याने मनाशी निश्चय केला.

झपाट्याने प्रवास करीत 'जनरल ग्रँट' तीन डिसेंबरला सन्‌फ्रान्सिस्कोला येऊन पोहोचली. मि. फॉगनी आपल्या वेळापत्रकात नोंद केली–

'वेळ वाचलेला नाही पण कुठे गमावला पण नाही.'

अमेरिकेच्या किनाऱ्यावर पाय ठेवल्याबरोबर मि. फॉगनी न्यूयॉर्कच्या आगगाडीची चौकशी केली. सध्याकाळी सात वाजता गाडी सुटणार होती.

एका बड्या हॉटेलमध्ये मि. फॉग श्रीमती औडा व धडपडेला घेऊन उतरले. नंतर तेथील ब्रिटिश कॉन्सलच्या कचेरीत जाऊन, मुंबई, कलकत्ता, हाँगकाँग, याकोहामाच्या शिक्क्यां-शेजारी त्यांनी सॅन्‌फ्रॅन्सिस्कोचा शिक्का आपल्या पासपोर्टवर मारून घेतला. संध्याकाळी आमची मंडळी वेळेवर आग-गाडीत चढली. फिक्स पण शेजारच्या डब्यात होतेच.

ही आगगाडी सारी अमेरिका ओलांडीत पॅसिफिक महासागरा-पासून अ‍ॅटलांटिक महासागरापर्यंत धावणार होती. हे अंतर ३७८६ मैलांचे होते. मि. फॉगच्या अंदाजाप्रमाणे हा प्रवास ती सात दिवसांत करणार होती.

कॅलिफोर्नियां, सिएरा नेवाडा मागे टाकीत गाडी धावत होती. विस्तृत गवती मैदानातून, प्रेअरींमधून जाताना मध्येमध्ये गुरांचे कळप आडवे येत होते व गाडी थांबवावी लागत होती. अशा वेळी धडपडे अगदी अस्वस्थ होऊन जात. गाडीला पोहो-चायला उशीर होईल व मग न्यूयॉर्कहून सुटणारी इंग्लंडची बोट चुकेल म्हणून ते कासावीस होत. एंजिन ड्रायव्हरने गुरांच्या कळपावर सरळच गाडी घालावी असे त्यांना वाटे. पण मि. फॉग मात्र अगदी स्वस्थ असत. हा खोळंबा त्याच्या हिशे-बात धरलेला होताच.

'ग्रेट सॉल्ट लेक' प्रदेश मागे पडला. ऑग्डेन आले. मग गाडी रॉकी माउंटन चढू लागली. समुद्रसपाटीपासून सात हजार फूट उंचीवरून ती चालली होती. दोनशे मैल डोंगरातून चालल्यानंतर ती सपाट प्रदेशात उतरणार होती व मग थेट अ‍ॅटलांटिक महासागराच्या किनाऱ्यापर्यंत सरळ जाणार होती.

पण डोंगर ओलांडण्यापूर्वीच गाडी एकदम थांबली. कर्कश शिट्ट्या मारू लागली.

●

## १३. शेवटी बोट चुकलीच

प्रवाशांनी गाडीखाली उड्या टाकल्या. 'काय झाले, काय झाले.' गलका सुरू झाला

शोधासाठी पाठवलेली माणसे सांगत आली–

' पुढचा पूल डळमळीत झाला आहे. त्यावरून गाडी जाणे शक्य नाही. '

आता आली का पंचाईत !

पण मि. फॉगना या संकटाची दादच नव्हती. ते श्रीमती औडा व फिक्स यांच्याबरोबर पत्ते खेळण्यात गढून गेले होते. भोवताली बर्फ पडत होते. प्रवासी थंडीने काकडून गेले होते. आता पुढला प्रवास कसा व्हायचा ?

' दहा मैल चालत पुढच्या स्टेशनवर गेल तर तिथून सुटणारी एखादी गाडी मिळेल.' कुणी तरी सुचवले.

अरे देवा ! या कडाक्याच्या थंडीत, बर्फावरून दहा मैल चालत कसे जाणार !

पण इंजिनड्रायव्हर मोठा धाडसी माणूस होता. तो म्हणाला, ' एक सांगू का ? पुलावरून गाडी पलीकडे न्यायच एकच उपाय आहे. '

' तो कोणता ?'

उत्सुकतेने उतारूंनी विचारले.

' गाडी मागे घेऊन भरधाव पुलावरून सोडायची–एखादे वेळेस धडाक्याने डळमळत्या पुलावरून सटकून जाईल–'

पण नाही सटकली तर ? मध्येच पूल कोसळला तर ? मग साऱ्यांचीच गच्छन्ती !

पण दुसरा काही पर्यायच नसल्यामुळे हा धोका पत्करायला सगळे तयार झाले. इतर उतारूबरोबर धडपडेही आपल्या डब्यात चढला. तो थरथर कापत होता. अजूनही पत्त्यांत गर्क असलेल्या तिघांना गाडी मृत्यूच्या मुखात उभी आहे हे सांग-

ण्याचा त्याला धीर होईना–

तेवढ्यात इंजिनने कर्कश शिटी फुंकली. ड्रायव्हरने एक मैल गाडी मागे घेतली. पुरेसा 'स्टार्ट' घेतल्यावर पुन्हा एकदा दीर्घ किंकाळी मारून गाडी भरधाव पुढे निघाली. जणू ती रूळांना स्पर्श न करता हवेतून उडत होती–

धाडधाड आवाज करीत गाडी क्षणार्धात पूल ओलांडून पली-कडे गेली–

गेली मात्र आणि मागे पूल धाडकन कोसळला.

एका संकटातुन गाडी निभावली पण तिच्यापुढे व तिच्यातील प्रवाशांपुढे आणखी एक संकट वाढून ठेवलेले होते.

कोलोरॅडो, नेब्रास्को या अमेरिकेच्या मुलुखातून गाडी चालली होती. नेब्रास्कोमध्ये एका रानटी रेडइंडियन टोळीचा फार उपद्रव असे. त्या टोळीने आगगाडीवर हल्ला चढविला. त्यांना प्रतिकार करणाऱ्यांशी मारामारी करून व मिळेल तेवढे सामान लंपास करून तिने पळ काढला.

गाडीचे व प्रवाशांचे फार नुकसान झाले. पण सर्वांत जास्त नुकसान होणार होते मि. फॉगचे.

आता ते न्यूयॉर्कला वेळेवर पोहोचून इंग्लंडची बोट कशी पकडणार ?

गाडीच्या इंजिनाची मोडतोड झाल्यामुळे व ड्रायव्हरला सपा-टूनच मार बसलेला असल्यामुळे, ही गाडी पुढे जाणे शक्यच नव्हते.

आता या बर्फमय प्रदेशात दुसरे वाहन कुठले मिळणार ?

धडपडे तडफडत होते; श्रीमती औडाला तर रडू कोसळले होते. फिक्सला पण फार दुःख होत होते. त्यालाही इंग्लंडला शक्य तितक्या लवकर पोहोचायचे होते. तिथे फॉगना पक-डून दिले म्हणजे त्यांना दोन हजार पौंडांचे बक्षीस मिळणार होते ना !

मि. फॉग बाह्यात्कारी तरी नेहमीप्रमाणे शांत होते. मग त्यांच्या मनात कितीही खळबळ उडालेली असो !

फिक्स तेवढ्या थंडीत, बर्फावरून कष्टाने चालत भोवताली चक्कर मारून आला व मि. फॉगना म्हणाला,

'तुम्हाला इंग्लंडची बोट पकडण्यासाठी न्यूयॉर्कला ११ डिसेंबरला पोहोचलेच पाहिजे, असा तुमचा नोकर धडपडे म्हणत होता.'

फिक्सला अजूनही उलगडा होत नव्हता की दरोडा घालून पळ काढणारा चोर एवढ्या धांदलीने इंग्लंडला जाण्यासाठी का धडपडतो आहे ?

पण मि. फॉग गंभीरपणे उत्तर देत होते.

'होय, इंग्लंडची बोट अकरा तारखेला मला न्यूयॉर्कला पकडलीच पाहिजे.'

'मग मी एक मार्ग सुचवितो. इथल्या एका माणसाच्या खोपटापुढे एक 'स्लेज' (बर्फावरून घरंगळत जाणारी गाडी) उभी करून ठेवलेली मला दिसली. वेग येण्यासाठी तिच्यावर शिडे पण बसवलेली आहेत ती आपल्याला मिळेल तर—'

'चला' मि. फॉग तावडतोब खोपटाच्या मालकाकडे गेले. स्लेज छानच होती. वाऱ्याच्या जोरावर या स्लेज गाड्या बर्फावरून खूपच वेगाने घरंगळत जातात.

ओमाहा स्टेशन या ठिकाणाहून दोनशे मैलांवर होते. ओमाहाला मि. फॉगना न्यूयॉर्कला जाणारी एखादी गाडी सहज मिळाली असती. मि. फॉगनी स्लेजच्या मालकाची गाठ घेतली व त्याला भरपूर भाडे व बक्षीस कबूल करून ओमाहापर्यंत स्लेज ठरवून टाकली.

स्लेज चालवणारा फारच हुशार होता. ताशी चाळीस मैलांच्या वेगाने त्याने आमच्या मंडळींना ओमाहाला आणून सोडले.

घाईघाईने स्टेशनमध्ये शिरून शिकॅगोला जाणारी एक्स्प्रेस गाडी आमच्या मंडळींनी पकडली. दहा डिसेंबरला गाडी शिकॅगोला पोहोचली. आता न्यूयॉर्क नऊशे मैल राहिले. शिकॅगोला दुपारी एक एक्स्प्रेस गाडी पकडून मंडळी न्यूयॉर्कला निघाली. इंडियाना; ओहायो, पेन्सिल्व्हेनिआ, न्यूजर्सी अशा

मजला मारीत ती न्यूयॉर्कला बंदराजवळ घेऊन ठेपली.

पण हाय ! मि. फॉगचे नशीब अजूनही त्यांना हुलकावण्या देत होते. 'चायना' नावाची लिव्हरपूलला जाणारी बोट पंचेचाळीस मिनिटांपूर्वीच सुटून गेली होती.

●

## १४. निश्चयाचे बळ

'चायना' सुटून गेल्यामुळे मि. फॉगच्या आशावृक्षाच्या जणू मुळावरच कुऱ्हाड पडली. पण निराश होऊन हातपाय गाळून बसणे मि. फॉगना ठाऊकच नव्हते.

इंग्लंडला जाणाऱ्या दुसऱ्या बोटीची ते चौकशी करू लागले. तशा एक दोन बोटी होत्या. पण त्या फारच लहान व मंद चालणाऱ्या होत्या. त्या इंग्लंडला वीस डिसेंबरपर्यंत पोहोचणे शक्यच नव्हते.

आता रात्रीचे दुसरे काहीच करणे शक्य नसल्यामुळे शांतपणे मि. फॉगनी श्रीमती औडाला व धडपडेला बरोबर घेऊन हॉटेलमध्ये मुक्काम केला.

दुसऱ्या दिवशी १२ डिसेंबरला सकाळी ते बंदरावर गेले. २१ डिसेंबरला अजून नऊ दिवस अवकाश होता. ११ डिसेंबरला 'चायना' मिळाली असती तर मि. फॉग आरामात लिव्हरपूलला २१ डिसेंबरला सकाळी पोहोचले असते. व गाडीने लंडन गाठून संध्याकाळी ८-४५ वाजता दि फॉर्म क्लबवर हजर झाले असते.

पण अजूनही वेळ गेली नव्हती. मि. फॉग डगमगले नव्हते. बंदरात नांगरून पडलेल्या बोटी ते न्याहाळू लागले. काही बोटी अगदी निघण्याच्या बेतात होत्या. हडसन नदीवरील या मोठ्या बंदरातुन रोज जवळजवळ शंभर बोटी जगातल्या निरनिराळ्या देशांकडे रवाना होत असत.

एक मालवाहू बोट हेनरिएटा नावाची लवकरच निघणार असे

दिसत होते. तिच्या धुराड्यातुन धुराचे लोट निघत होते. एका होडीतुन मि. फॉग हेनरिएटाच्या कप्तानकडे गेले.

'कुठे जाणार आहे तुमची बोट ?' त्यांनी विचारले.

कप्तान मि. फॉगसारखाच मितभाषी होता.

'फ्रान्समधल्या बॉर्दो बंदराला.' तो उत्तरला.

'उतारू घेणार काय ?'

'कधीच घेत नसतो—साले फार कटकट करतात.'

'मी व माझे तीन सहप्रवाशी—आम्हाला इंग्लंडमध्ये लिव्हरपूलला नेणार का ?'

'छट्. माझी बोट बॉर्दोला जाणार आहे.'

'वाटेल तेवढे भाडे मी देऊ केले तरी—'

'वाटेल तेवढं भाडं मिळालं तरी—'

'मालक कुठाहेत ? त्यांना विचारतो.'

'मीच मालक आहे बोटीचा.'

'असं ? बरं, मला तुमची बोट विकत घ्यायची आहे.'

'बोट विक्रीसाठी नाही.'

'भाड्यानं तर द्याल. बार्दोपर्यंत दोन हजार डॉलर देईन.'

'दर माणशी ?' कप्तानाचा सूर जरा बदलला.

'हो, दर माणशी. आम्ही चार जण आहोत.'

म्हणजे आठ हजार डॉलर्स झाले—बापरे !

स्पिडिचे डोळे लोभाने चकाकू लागले. तो म्हणाला,

'बोट नऊ वाजता सुटेल.'

साडे आठ झाले होते.

'आम्ही नऊ वाजता बोटीवर हजर आहोत असं समजा.'

आणि त्याप्रमाणे मि. फॉग, श्रीमती औडा व धडपडे यांना घेऊन बरोबर नऊ वाजता बोटीवर हजर झाले. धडपडेचा मित्र म्हणवणारा व स्लेज मिळवून देण्यास साहाय्यभूत झालेला फिक्स अर्थात् बरोबर होताच.

दुसऱ्या दिवशी डिसेंबरची तेरा तारीख.

हेनरीएटाच्या पुढल्या टोकावरून एक इसम दुर्बिणीने आस-

पासचा वेध घेत होता.
बोटीचे कप्तान मधूनमधून असे वेध घेतातच.
पण हा इसम काही हेन्‌रिएटाचा कप्तान स्पीडी नव्हता
हे होते मि. फॉग. कप्तान स्पीडी आपल्या केबिनमध्ये बंदि-वान होऊन पडला होता व आरडाओरड करीत मनगटे चावीत होता.
मि. फॉगनी बारा डिसेंबरचा सगळा दिवस बोटीवरील खला-शांशी गुफ्तगू करण्यात व आपल्या बॅगेतल्या नोटा त्यांना मुक्तपणे वाटण्यात खर्च केला होता. त्या सर्वांना आपल्या बाजूला वळवून घेऊन त्यांच्या मदतीने कप्तान स्पीडीला त्यांनी त्याच्याच केबिनमध्ये डांबून टाकले होते.
मि. फॉगचा नाईलाज झाला होता. काही केले तरी कप्तान बोट लिव्हरपूलला न्यायला तयार होत नव्हता. सामदामाचे उपाय थकल्यावर चौदावे रत्न कप्तानाला दाखवणे मि. फॉगना भागच पडले.
आता मि. फॉग बोटीचे कप्तान झाले त्यांच्या पूर्वायुष्यात त्यांनी केव्हातरी बोट चालविण्याचे शिक्षण घेतले असावे. सराईतपणे ते खलाशांना योग्य त्या सूचना देत होते.
आता बोट बॉर्दोचा मार्ग सोडून लिव्हरपूलच्या दिशेने चालली होती.
वाफेचे एंजिन व शिडे—दोन्हीच्या सहाय्याने हेन्‌रिएटा झपा-ट्याने अंतर तोडू लागली. वेगाबद्दल ती प्रसिद्धच होती. ताशी बारा ‘नॉट’ ती सहज जाई. (नॉट = ६०८० फूट समुद्रावरील अंतर नॉटच्या भाषेत मोजतात) लिव्हरपूल-पर्यंतची तीन हजार मैलांची मजल ती नऊ दिवसांत मारील असे वाटत होते.
अर्धा प्रवास तर छान पार पडला. पण मग एक दिवस बोटीचा इंजिनियर वाईट तोंड करून मि. फॉगकडे आला.
मालक, आपण सांगितल्याप्रमाणे वेग चढता ठेवल्यामुळे कोळसा भरमसाठ खर्च झालाय. वाफेचा दाब वेताचा ठेवून

बॉर्दोला पोहोचले अशा अंदाजानं बोटीवर कोळसा भरलेला होता. पण आपण वाफेचा दाब खूप वाढवून बोट पिटाळली. हाच वेग ठेवला तर लिव्हरपूलला पोहोचण्याला पुरेल इतका कोळसा आता शिल्लक नाही.'

'काही झालं तरी दाब व वेग कमी करायचा नाही. लिव्हरपूलची दिशा कायम ठेवा. इंधनाची मी काही तरी करतो व्यवस्था.' मि. फॉग म्हणाले. पुन्हा दोन दिवसांनी इंजिनियरने सूचना दिली.

'आजच्या दिवस पुरेल इतकाच कोळसा आहे.'

'कोळसा धडाक्याने जळू दे. एंजिनाला भरपूर वाफेचा दाब मिळू दे. संध्याकाळच्या आत आणखी इंधन देतो तुम्हाला.' फॉग म्हणाले.

आश्चर्य करीत इंजिनियर आपल्या जागेवर गेला.

फिक्स व धडपडे तळमळत होते. श्रीमती औडाचे हातपाय गळून गेले होते.

शांतपणे मि. फॉगनी कॅप्टन स्पीडीला आपणासमोर हजर करण्याचा हुकूम सोडला.

कॅप्टन स्पीडी एखाद्या वाघासारखा खवळला होता. आल्याबरोबर तो गुरगुरला.

'कुठल्या भागात आहोत आपण?'

'लिव्हरपूल इथून सातशे मैलांवर आहे.' संथपणे फॉग म्हणाले. दातओठ खात स्पीडी गरजला,

'अशी चांचेगिरी केलीस काय–लुटारू, वाटमाऱ्या कुठला!' मि. फॉग शांतपणे पुढे बोलू लागले.

'तुझी बोट विकत घ्यायची आहे मला–तिच्यातलं लाकूडकाम जाळावं लागणार आहे.'

'जाळणार–माझी बोट जाळणार?' अति रागाने स्पीडीच्या तोंडाला फेस येऊ लागला होता. 'पन्नास हजार डॉलर मोजले आहेत मी तिच्यासाठी.'

'सगळी नाही जाळणार. फक्त लाकडी भाग तेवढे

कोळसा संपला म्हणून. तुझ्या बोटीचे नगद साठ हजार डॉलर द्यायला तयार आहे मी.'

स्पीडीला समजावीत मि. फॉग म्हणाले,

मि फॉगच्या शब्दांपेक्षा डॉलर्सच्या आकड्याने स्पीडीची समजूत पडू लागलीसे दिसले. त्याने मनाशी विचार केला,

'बोट झाली आहे वीस वर्षांची जुनी. लाकूड तर आतून कुजू लागले आहे–' तो एकदम म्हणाला.

'बोटीचा खालचा पोलादी सांगाडा–तुम्ही लिव्हरपूलला पोचल्यावर तो परत कराल मला?'

'अर्थात्च. शिवाय आतल्या यंत्राना वगैरे धक्का लागणार नाहीच.

'ठरलं तर मग.'

बॅगेतुन साठ हजारांचा ऐवज मि. फॉगनी काढला व स्पीडीने तो हावरेपणाने मोजून कबजात घेतला.

आता स्पीडीला केबिनमध्ये कोंडण्याची जरुरी राहिली नव्हती. आता तो उलट, बोट चालविण्यात मदत करू लागला.

मि. फॉगच्या हुकमाने बोटीवर जेवढे म्हणून लाकडी भाग होते ते सारे तोडून मोडून भट्टीत टाकण्यात येऊ लागले. लाकडी तक्तपोशी, कठडे, जिने, खुर्च्या, टेबलें, वल्ही, छोट्या होड्या. सारे, सारें काही भट्ट्यांची भूक भागवू लागलें. भट्ट्या धडाडू लागल्या. वाफ सरसरू लागली. इंजिने जोरा-जोराने बोटीला वाढती गती देऊ लागली.

वीस डिसेंबरची संध्याकाळ झाली. पण अजून लिव्हरपूल लांब होते. लाकडे संपत आली–तसाच फिक्स, धडपडे व श्रीमती औडा यांचा धीरही.

मग कॅप्टन स्पीडी मि. फॉगना म्हणाला.

'तुम्हाला एकत्तीस डिसेंबरला लिव्हरपूल गाठायचं आहे ना? मग एक उपाय सुचवतो. लिव्हरपूलपर्यंत इंधनाचा पल्ला येईलसं वाटत नाही. वेळही जास्त लागेल. तेव्हा असं करा, आयर्लंडमधल्या क्वीन्स टाऊन बंदराच्या आपण अगदी

जवळ आलो आहो. इथंच उतरा. एक्स्प्रेस गाडी गाठून डब्लिनला जा. तिथं तुम्हाला लिव्हरपूलला जाणारी वेगवान मेल बोट मिळेल. टपाल नेणारी ती बोट तुम्ही भरपूर पैसे दिलेत तर तुम्हाला उतारू म्हणून घेईल.'

स्पीडीचा मोलाचा उपदेश मि. फॉगनी ताबडतोब मानला. क्वीन्स टाऊन, डब्लिन करीत टपाल-बोटीतून ते लिव्हरपूलला २१ डिसेंबरला दुपारी अकरा वाजता येऊन थडकले.

आता लंडन म्हणजे आठ-साडेआठ तासांचा प्रवास.

ते अगदी लंडनच्या उंबरठ्यावरच येऊन ठेपले होते. म्हणाना—पण या उंबरठ्यातच त्यांना जबरदस्त ठेच लागली. ●

## १५. पैज हरले—पैज जिंकली

मि. फॉगबरोबरच फिक्स पण लिव्हरपूलला उतरला. ब्रिटिश मुलखाला पाय लागल्याबरोबर तो तुरुतुरु चालत मि. फॉग-जवळ गेला.

'तुम्हीच मि. फाग ना!' त्यांनी करड्या आवाजात विचारले.

'होय.'

'इंग्लंडच्या राणीच्या हुकुमान्वये मी तुम्हाला अटक करीत आहे.'

खिशातून वॉरंट काढीत फिक्स म्हणाला.

फिक्सबरोबर मि. फॉग लिव्हरपूलच्या कस्टमहाऊसमध्ये गेले व एका बाकावर शांतपणे बसून राहिले. समोर टेबलावर ठेवलेल्या आपल्या घड्याळावर त्यांची नजर खिळली होती. अजून सहा तास बाकी होते.

पण ह्या शेवटच्या घासाला-मक्षिकापात झाला होता.

खोलीच्या बाहेर श्रीमती औडा व धडपडे बसले होते—तळमळत, तडफडत. यश नजरेसमोर होते—पण हातून निसटणारसे दिसत होते. काय हा दैवदुर्विलास!

आपल्याला अटक का करण्यात आली आहे याचा तपशील मि. फॉगना माहीत नव्हता. पण धडपडेला मि. फॉगवर

बँकेवर दरोडा घातल्याचा आरोप असल्याचे फिक्सकडून कळले होते व त्यांनी औडालाही आता ते सांगितले होते. आता धडपडे हळहळत होते. या आरोपाबद्दल आपण मालकांना आधीच सांगितले असते तर त्यांनी बोटीवरच सावकाशपणे फिक्सला आपला निरपराधीपणा सिद्ध करून दाखवला असता. औडाला तर अश्रू आवरत नव्हते. तिला प्राणसंकटा-तून सोडवणारा—आता तिला सहवासाने अत्यंत प्रिय झालेला थोर अंतःकरणाचा हा पुरुषोत्तम, पण या क्षणी ती त्याच्यासाठी काहीही करू शकत नव्हती !

मि. फॉग बसल्याबसल्या शांतपणे आपल्या दैनंदिनीत नोंद करीत होते.

‘शनवार, डिसेंबर २१. पृथ्वीप्रदक्षिणेचा ८० वा दिवस. वेळ—सकाळचे ११.४० मुक्काम लिव्हरपूल.’

घड्याळाचे काटे भराभर पुढे सरकत होते.

दुपारचे दोन वाजले.

अजूनही वेळ गेली नव्हती. अजूनही एखादी गाडी पकडून ८-४५ वाजेपर्यंत लंडनला पोचता आले असते.

प्रथमच—या ऐंशी दिवसांमध्ये प्रथमच—मि. फॉगच्या कपाळा-वर एक बारीकशी चिंतेची आठी पडली.

दोन वाजून तेहतीस मिनिटे झाली.

अन् बाहेर दारे धडाधड वाजली.

आवाजांचा गोंगाट ऐकू येऊ लागला.

फिक्स धापा टाकीत खोलीत घुसला.

कपडे अस्ताव्यस्त—केस फिस्कारलेले-चेहरा कमालीचा पडलेला. तो काहीतरी बोलण्याचा प्रयत्न करीत होता— पण त्यांच्या तोंडातून भराभर शब्द बाहेर पडत होते.

‘माफ करा—माफ करा—साहेब—मोऽठी—भयंकर मोठी चूक झाली माझ्या हातून ही आऽताऽच तार आली लंडनहून. खऽऽराऽ चोऽऽर हा आताच पकडला गेला आहे पुराव्याऽ सह. आऽता आऽपऽण जाऽऊ शकता—’

एका उडीत मि. फॉग फिक्सच्या जवळ गेले.

त्याच्याकडे एक क्षण त्यांनी अगदी रोखून बघितले, आणि—

दोन्ही मुठी वळून फिक्सच्या तोंडावर त्यांनी भराभर चार ठोसे लगावले.

साऱ्या जन्मात प्रथमच मि. फॉग इतके रागास चढले होते !

दारात येऊन उभा राहिलेला घडपडे हर्षभराने ओरडला.

' वहाव्वा रे ठोसा !!

डोळ्याचे पाते लवते न लवते तोच तिघेही घोडागाडीत चढून वायुवेगाने लिव्हरपूल स्टेशनवर पोहोचले.

तेव्हा दोन वाजून चाळीस मिनिटे झाली होती—

आणि लिव्हरपूलहून लंडनला जाणारी एक्स्प्रेस गाडी पस्तीस मिनिटांपूर्वीच सुटून गेली होती.

पण मि. फॉग थोडेच या अडथळ्याला जुमानणार !

आपल्या नेहमीच्या पद्धतीने भरपूर पैसे व बक्षिसी कबूल करून त्यांनी एक स्पेशल गाडी ठरविली.

बरोबर तीन वाजता ही एक्स्प्रेस गाडी लिव्हरपूलहून सुटली.

जास्तीत जास्ती वेगानं दौडून आगगाडी लिव्हरपूलहून लंडनला साडेपाच तासात पोहोचू शके—

पण वाटेत अडथळे आले नाही तर— ' लाइन क्लीअर ' असली तर—

या स्पेशल गाडीला अर्थातच ' क्लिअर लाइन ' मिळणे अशक्यच होते. त्यामुळे वाटेत किती वेळा तरी वाट मोकळी होईपर्यंत गाडीला थांबावे लागले.

गाडी लंडनला पोहोचली तेव्हा सारी घड्याळे एकच वेळ दाखवीत होती—

आठ वाजून पन्नास मिनिटे !

साऱ्या जगाला वळसा घालून इंग्लंडच्या भूमीवर ऐंशी दिवसात परतलेल्या मि. फॉगना—

पाच मिनिटे उशीर झाला होता.



हातात घट्ट धरून ते म्हणाले,

'मी तुझ्यावर केव्हापासूनच प्रीती करू लागलो आहे औडा. तनमनाने सर्वस्वी तुझा होण्यात मला धन्यच वाटेल.'

मि. फॉगना कुठलीही गोष्ट लांबणीवर टाकणे माहीतच नव्हते. त्यांनी तावडतोब धडपडेला हाक मारली.

'पलीकडच्या रस्त्यावर नं. १८ मध्ये राहाणाऱ्या रेव्हरंड विल्सनकडे जा, व आमच्या दोघांच्या लग्नाची नोटीस त्यांच्याकडे नोंदवून ये. उद्या म्हणजे सोमवारीच लग्नाचे नक्की करा म्हणावं.'

आमच्या धडपडेच्या आनंद गगनात मावेना. तो पळतच पाद्री साहेबांकडे निघाला.

पण जितक्या वेगाने तो गेला त्याच्या दुप्पट वेगाने परत आला. एखाद्या माथे फिरलेल्या माणसाप्रमाणे वाटेत सगळ्यांना धक्के मारीत, वाट काढीत तो पळत सुटला होता.

परत येऊन मि. फॉगपुढे तो उभा राहिला. पण प्रयत्न करूनही धाप लागल्यामुळे त्याच्या तोंडातुन शब्द फुटेना.

'काय झालं ?' औडाने विचारले.

एक एक शब्द कष्टाने उच्चारीत धडपडे म्हणाला.

'उद्या लग्न होऊ शकणार नाही.'

'का ?' मि. फॉग शांतपणे म्हणाले.

'कारण...उद्या...उद्या...रविवार आहे...'

'उद्या सोमवार आहे.' मि. फॉग थंडपणे म्हणाले.

'नाही, नाही.' धडपडे घाईघाईने म्हणाला.

'उद्या रविवार...आज...आजच शनिवार आहे.'

'आज शनिवार ? अशक्य !' मि. फॉग म्हणाले.

आता धडपडेची धांदल उडाली. तो घाईघाईने बोलू लागला. शब्दात शब्द अडकू लागले.

'हो, हो, हो. आज शनिवार आहे. तुमची दिवस मोजण्यात काहीतरी चूक झाली. आपण इथं ठरलेल्या दिवसापेक्षा एक दिवस आधी आलो. पण आता– आता मात्र दहाच मिनिटे

उरली आहेत—चला, उठा.
धडपडेने बकोट्याला धरून मालकाला खोलीबाहेर काढले.
दोन मिनिटात कपडे करून मि. फॉग घोडागाडीत चढले.
'हाकल जोरात' ते गाडीवानाला म्हणाले.
'रिफॉर्म क्लब. पाच मिनिटात पोचवलेस तर शंभर पौंड बक्षीस.'

## १६. शेवट गोड झाला

रिफॉर्म क्लबमध्ये ता. २१ डिसेंबर, शनिवार रोजी संध्याकाळी सात वाजल्यापासूनच मि. फॉगचे पैज मारणारे पाची मित्र जमले होते.
रिफॉर्म क्लबच्या बाहेरही लोकांची गर्दी जमू लागली होती. दोन ऑक्टोबरला या पृथ्वीप्रदक्षिणेबद्दल लोकांच्यात जितका उत्साह संचारला होता त्याहूनही जास्त आज आढळून येत होता. दोन ऑक्टोबरचा उत्साह नऊ ऑक्टोबरची मि. फॉग हे दरोडेखोर असल्याची बातमी आल्यापासून थंडावला होता. पण शुक्रवारी, २० ऑक्टोबरला खरा चोर पकडल्याची बातमी लंडनमध्ये पसरल्याबरोबर लोकांच्यात पुन्हा उत्साहाचे वारे संचारले. लोक पुन्हा मि. फॉगच्या यशापयशाबद्दल आपापसात पैजा मारू लागले होते, व शनिवार दि. २१ डिसेंबरची ८॥। ची वेळ जसजशी जवळ येऊ लागली. तसतशी रिफॉर्म क्लब समोरची लोकांची गर्दी वाढत गेली.
मि. फॉगच्या पाची मित्रांचे डोळे, हातांतील पत्त्यांवरून, सारखे घड्याळाकडे वळत होते.
प्रत्येकी चार हजार पौंडांचा प्रश्न होता ना! नऊ ऑक्टोबरच्या बातमीने आपले पैसे वाचले म्हणून ते खुषीत आले होते. पण शुक्रवारच्या बातमीने पुन्हा ते अस्वस्थ झाले होते. मि. फॉग ठरलेल्या वेळी येऊन दाखल होतील का?

पण ते या घटकेला होते तरी कुठे ?

उत्साही वर्तमानपत्रांनी शुक्रवारपासूनच हिंदुस्थान, जपान, अमेरिका वगैरे देशांत तारा पाठवून मि. फॉगची काही बातमी काढण्याचा प्रयत्न केला होता. पण त्यांचा काहीच उपयोग झाला नव्हता.

आठ वाजून वीस मिनिटे झाली.

'लिव्हरपूलहून येणारी आजची शेवटची गाडी किती वाजता येते लंडनला ?'

एकजण म्हणाला,

'सात वाजून तेवीस मिनिटांनी. नंतर मध्यरात्रीपर्यंत गाडी नाही.' दुसऱ्याने उत्तर दिले.

आठ वाजून तेहतीस मिनिटे.

'या शेवटच्या गाडीने मि. फॉग आलेले असले तर यावेळेपावेतो इथे येऊन नक्कीच पोचले असते-- मित्रहो, मला वाटते आपण पैज जिंकली आहे.' मि. स्टुअर्ट म्हणाले.

'ऊं हूं !' मि. फॅलेन्टिन म्हणाले, एवढी घाई करू नका. मि. फॉगचा काटेकोर वक्तशीरपणा विसरलात की काय ? ८॥। म्हणजे अगदी बरोबर ८॥। वाजता इथे हजर होण्याचा विचार असेल स्वारींचा.'

अहो, पण न्यूयॉर्कहून काल आलेल्या बोटीत ते नव्हते. पुढली बोट आणखी वीस दिवसांनी येणार म्हणजे मि. फॉग अगदी पार हरले म्हणाना.' मि. फ्लॅनगॅन म्हणाले.

घड्याळात ८-४० झाले.

'आता मि. फॉगचा वीस हजार पौण्डांचा चेक आपल्या पदरात पडलाच म्हणाना.' मि. राल्फ म्हणाले.

'अजून पाच मिनिटे बाकी आहेत !' मि. स्टुअर्ट म्हणाले पाची जणांनी एकमेकांकडे बघितले सर्वांच्या छातीची धडधड सारखी वाढत होती.

'८.४२....८.४३ ...८.४४'

आता साठ सेकंद राहिले. हातातले पत्ते खाली टाकून पाचही

जण उत्तेजित होऊन उठून उभे राहिले व एकेक सेकंद मोजू लागले.

५५ व्या सेकंदाला रस्त्यावरून आरोळ्या व जयघोष ऐकू येऊ लागला.

पाचही जणांच्या नजरा दाराकडे वळल्या.

बाहेरचा गलका वाढतच जात होता. ५७ व्या सेकंदाला दरवाजा सताड उघडला.

मि. फॉग दारात उभे होते.

त्यांच्या पाठीमागे रस्त्यातले लोक खुशाल क्लबात घुसत होते.

मि. फॉग शांत, संथ स्वरात म्हणत होते,

' मित्रहो, ठरल्याप्रमाणे मी येऊन हजर झालो आहे.'

●

याप्रमाणे मि. फॉगनी वीस हजार पौण्ड पैज लावून जिंकले. अर्थात् त्यामुळे त्यांचा प्रत्यक्ष असा आर्थिक फायदा काहीच झाला नाही. कारण प्रवासात त्यांचे एकोणीस हजार पौण्ड खर्च झाले होते.

उरलेल्या हजार पौण्डांपैकी पाचशे पौण्ड त्यांनी आपल्या एकनिष्ठ नोकराला, धडपडेला दिले. अर्थात् या बक्षिसातून त्यांच्या कडक शिस्तीप्रमाणे गॅसचे बिल कापून घ्यायला ते विसरले नाहीत.

बाकीचे पाचशे पौण्ड त्यांनी—

त्यांचे अभिनंदन करण्यासाठी आलेल्या फिक्सला दिले.

मि. फिक्स आश्चर्याने पाहातच राहिला.

पण मि. फॉग म्हणाले,

' मला आवडली तुमची कर्तव्यदक्षता, चिकाटी व चतुराई.'

ज्या फिक्सने खोटी समजूत करून घेऊन मि. फॉगच्या मार्गात अनंत अडचणी उभ्या केल्या होत्या व पैज हरण्याची त्यांच्यावर वेळ आणली होती, त्या फिक्सबद्दलची त्यांची गुणग्राहकता व मनाचे औदार्य पाहून औडाच्या त्यांच्याबद्दलच्या प्रीतीला आणखीनच भरते आहे.